


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०१ ■ सोमवार, दि. ११ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# ... हे तरअपयशाचे पुरावे !



## राहुल गांधींची नरेंद्र मोदींच्या आवाहनांवर प्रतिक्रिया ...

### पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते..!

पंतप्रधान मोदी यांनी हैदराबादमधील जनसभेला संबोधित करताना म्हटले की, 'मी लोकांना आवाहन करतो की आखातात चालू असलेल्या युद्धाचा फटका भारताला बसू द्यायचा नसेल तर पेट्रोलियम उत्पादनांचा कमी वापर करावा, विदेशी वस्तू टाळून जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा,शक्य तिथे वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या, वर्षभरासाठी सोने खरेदी टाळा, सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करून पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, स्वयंपाक बनवण्याच्या तेलाचा वापर कमी करा, रासायनिक शेतीकडून सेंद्रिय शेतीकडे वळा आणि वर्षभरासाठी विदेशी प्रवास टाळा,असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते.



प्रतिनिधी ११ मे

**मुंबई :** इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना मोठे आवाहन केले आहे. त्यांनी सोने खरेदी न करणे, परदेश दौरे कमी करणे आणि पेट्रोलचा वापर कमी करण्यास सांगितले आहे. यासोबतच कंपन्यांना 'वर्क फ्रॉम होम' वाढवण्यासही सांगितले आहे. पंतप्रधान मोदींच्या या आवाहनावर काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी म्हटले आहे की, हे उपदेश नसून उलट अपयशाचे पुरावे आहेत.

### पंतप्रधानांनी जे सांगितले त्याची अंमलबजावणी करायला हवी..! -मुख्यमंत्री



'पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अशा परिस्थितीतही आपला इंधन पुरवठा प्रभावित होऊ दिलेला नाही. आपल्याला पेट्रोल, एलपीजी मिळतोय. पण जर आपण हे संकट समजून घेतलं नाही आणि या इंधनाचा वापर योग्य प्रकारे केला नाही, तर मला वाटतं आपल्यालाही टंचाईचा सामना करावा लागेल. त्यामुळे पंतप्रधानांनी जे सांगितलंय, त्यावर देशातील सर्व नागरिकांनी अंमलबजावणी करायला हवी', असे आवाहन देवेंद्र फडणवीसांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रविवारी संध्याकाळी देशवासीयांना केलेल्या आवाहनावर सध्या राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अमेरिका इस्रायल व इराण यांच्यात गेल्या दोन महिन्यांपासून चालू असलेल्या युद्धाचा फटका अवघ्या जगाला बसत असून त्याची झळ भारतालाही आता बसू लागली आहे. त्याचा परिणाम म्हणून मोदींनी देशवासीयांना पेट्रोलियम उत्पादनांचा जपून वापर करावा, असं आवाहन केलं आहे. यामुळे परकीय चलनाची मोठ्या प्रमाणावर बचत होईल, असंदेखील मोदींनी म्हटलं आहे.

पंतप्रधानांच्या या विधानावर राहुल गांधी यांनी कडक शब्दांत टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, 'हे उपदेश नसून गेल्या १२ वर्षांतील अपयशाचे पुरावे आहेत. देशाला अशा वळणावर आणून ठेवले आहे की, आता जनतेला काय खरेदी करावे, कुठे जावे आणि काय करू नये, हे सांगावे लागत आहे. स्वतःची जबाबदारी झटकण्यासाठी प्रत्येक वेळी दोष जनतेवर ढकलून देतात. देश चालवणे आता 'कॉम्प्रमाईज्ड' (तडजोड केलेल्या) पंतप्रधानांच्या हातातील गोष्ट राहिलेली नाही.

राहुल गांधी यांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत आपला संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटलंय की, 'मोदीजींनी काल जनतेकडे त्यागाची मागणी केली. सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका, पेट्रोलचा वापर कमी करा, खते आणि खाद्यतेलाचा वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा, घरून काम करा. हे उपदेश नाहीत - हे अपयशाचे पुरावे आहेत.

> पंतप्रधान मोदींनी जनतेला आवाहन केले की, त्यांनी येत्या एक वर्षापर्यंत सोने खरेदी करू नये. इराण युद्धामुळे जगभरात पेट्रोल आणि डिझेल महाग झाले आहे, त्यामुळे इंधन बचत करणे गरजेचे आहे.

# एलपीजी सबसिडी बंद होणार ?

## एचपीसीएलच्या नावाने येणाऱ्या संदेशामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम



प्रतिनिधी ११ मे

**नागपूर :** 'उपलब्ध आयकर नोंदीनुसार तुमचे वार्षिक उत्पन्न १० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. सात दिवसांत हरकत नोंदवा, अन्यथा गॅस अनुदान बंद केले जाईल,' असा संदेश अलीकडे अनेक गॅस ग्राहकांच्या भ्रमणध्वनीवर येत असून त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा संदेश खरोखरच अधिकृत आहे की फसवणुकीचा प्रकार, याबाबत अनेकजण साशंक आहेत.

ग्राहकांच्या मोबाईलवर येणारा सदर संदेश हिंदुस्तान पेट्रोलियम महामंडळाच्या नावाने पाठविण्यात येत आहे. त्यात ग्राहकांना टोलमुक्त क्रमांक १८००-२३३३-५५५ वर संपर्क करण्यास किंवा दिलेल्या दुव्यावर हरकत नोंदविण्यास सांगण्यात आले आहे. 'निर्धारित वेळेत प्रतिसाद न दिल्यास गॅस अनुदान बंद केले जाऊ शकते, असा इशाराही संदेशात देण्यात आला आहे.




**CLASSIFIED**

**पाहिजे**

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!

१) मार्केटिंगसाठी ३ मुले
(२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५

२) माल पोहचवायला २ मुले

-:संपर्क:-

**आदिराज इंटरप्रासेस**
प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं.४
राजकमल चौक,अमरावती
मो. 7028286766

# टेंडर काढले पण, शहरातील कुत्र्यांची संख्या किती ?

## अकोला महापालिकेचा अजब अंदाज

प्रतिनिधी ११ मे

**अकोला:** सन २०११ च्या जनगणनेनुसार अकोल्याची लोकसंख्या चार लाख होती. ती आता सात लाख गृहित धरत अकोल्यात प्रति शंभर माणसाला चार कुत्रे या प्रणामे २८ हजार असल्याचा अंदाज काढत कुत्र्यांचे फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशनचे टेंडर काढण्यात आले. मुळात किती कुत्र्यांची फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन करायचे आहे हेच माहिती नसताना हवेत गोळीबार केल्या प्रमाणे महापालिकेचे विविध विभाग काम करत असल्याचे चित्र आज स्थायी समितीत दिसून आले. या विषयावर शिवसेना नगरसेवक सागर भारुका, निलेश देव, आझाद खान, फजलु पहेलवान, हरिश आलिमचंदानी, मंजुषा शेळके यांनी विविध सुचना करत कुत्र्यापासून अकोलेकरांना वाचवा अशी मागणी केली.तर दूसरीकडे नायगाव डंपिंग ग्राऊंड येथील कचऱ्याचे खतात रुपांतर करण्यासाठी बायोमायनिंग करण्यासाठी काढलेल्या टेंडरमध्ये टेंडर घेणारी कंपनी कुठली याची साधी माहिती अधिकाऱ्यांना नव्हती. तर या पुर्वी ज्या कंपनीला काम दिले त्या कंपनीने ते काम का सोडले, त्यांना ब्लॅकलिस्टेट का केले गेले नाही याचे कुठलेही समर्पक उत्तर महापालिकेचे अधिकारी अजय गुजर देऊ शकले नाही. पुढील काळात नायगाव येथील असलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी ४१ लाखांची निविदा मात्र मंजुर करण्यात आली. महापालिकेच्या स्थायी समितीत विविध विषयांवर चर्चा झाली असून प्रशासनातील अधिकारी हे पुर्ण माहिती न घेता सभेत उपस्थित राहत असल्याचे गंभीर चित्र आज समोर आले.

➤ सविस्तर वृत्त पान ८ वर..






# डायल ११२ वर खोटी माहिती देणाऱ्या इसमावर गुन्हा दाखल

**पातूर :** आपत्कालीन सेवा डायल ११२ वर खोटी माहिती देऊन पोलीस यंत्रणेला त्रास देणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ९ मे रोजी एका व्यक्तीने डायल ११२ वर कॉल करून आपल्या भाचीवर गावातील काही मुलांनी लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दिली. या गंभीर माहितीची दखल घेत पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व चौकशी सुरू केली. घटनास्थळी भेट देऊन संबंधित व्यक्तींची विचारपूस व बयाण नोंदविण्यात आले. मात्र तपासाअंती सदर माहिती पूर्णपणे खोटी असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी गणेश महादेव झाटे (२५) याच्याविरुद्ध पोलिसांना जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी माहिती दिल्याप्रकरणी बीएनएस अधिनियमाच्या कलम १७७अन्वये चान्नी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# लग्नातील फटाके, डीजे आणि आपली जबाबदारी



आजच्या आधुनिक काळात लग्नसमारंभ हे संस्कारापेक्षा दिखाव्याचे साधन बनत चालले आहेत. मोठमोठे स्पीकर, कानठळ्या बसवणारा डीजे, आकाश दणाणून सोडणारे फटाके आणि रात्री उशिरापर्यंत चालणारा गोंगाट - या गोष्टींना अनेक लोक आनंदाचे प्रतीक मानतात. परंतु या तथाकथित आनंदामागे अनेक निरपराध जीवांची वेदना दडलेली असते, याचा विचार फार कमी लोक करतात.

झाडांवर शांतपणे विसावलेले पक्षी अचानक फटाक्यांच्या आवाजाने घाबरून उडू लागतात. अनेक पक्षांना दिशाच समजत नाही. काही पक्षी जखमी होतात, तर काहींची पिल्ले घरट्यातून खाली पडतात. कुत्रे, मांजरे, जनावरे भयभीत होऊन थरथर कापतात. एवढेच नव्हे तर लहान मुले, वृद्ध व्यक्ती, आजारी रुग्ण आणि अभ्यास करणारे विद्यार्थी यांनाही या ध्वनीप्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो.

लग्न हे आपल्या भारतीय संस्कृतीत एक पवित्र संस्कार मानले गेले आहे. दोन जीवांचे, दोन कुटुंबांचे प्रेमपूर्वक मिलन म्हणजे लग्न. या मंगल कार्यात शांती, प्रेम, संयम आणि सद्भावना असणे अपेक्षित असते. परंतु आज अनेक ठिकाणी लग्न म्हणजे केवळ मोठेपणा दाखवण्याची स्पर्धा झाली आहे. आनंद साजरा करण्याच्या नावाखाली निसर्गाला, पशुपक्ष्यांना आणि समाजाला त्रास दिला जात आहे.

अशा वेळी एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो — जर आपण अशा लग्नसमारंभात उपस्थित राहिलो, तर त्या चुकीच्या कर्मात आपणही सहभागी ठरतो का?

अनेक लोक सहजपणे म्हणतात, 'फटाके आपण थोडे फोडतो?', 'डीजे आपण थोडा लावतो?', 'आपण तर फक्त लग्नाला गेलो होतो.' पण धर्म, नैतिकता आणि कर्मसिद्धांत यांच्या दृष्टीने विचार केला तर ही भूमिका पूर्णपणे योग्य ठरत नाही. कारण चुकीच्या गोष्टीला शांतपणे समर्थन देणे हे देखील त्या कर्मात सहभागी होण्यासारखेच असते.



धर्मशास्त्रात सांगितले आहे की पाप फक्त स्वतः चुकीचे कर्म केल्यानेच लागत नाही, तर दुसऱ्याकडून करवून घेणे किंवा चुकीच्या कर्माला समर्थन देणे यामुळेही कर्मबंधन निर्माण होते. जर आपल्या समोर एखादी गोष्ट जीवांना त्रास देत असेल आणि आपण त्याचा विरोध न करता त्या गोष्टीचा आनंद घेत असू, तर आपण त्या चुकीचे मूक समर्थक ठरतो.

खरा धर्म हा फक्त पूजा, व्रत, मंदिर किंवा बाह्य परंपरांमध्ये नसतो. खरा धर्म म्हणजे दया, करुणा आणि संवेदनशीलता. आपल्या आनंदासाठी जर एखादा पक्षी भयभीत होत असेल, एखादा वृद्ध त्रस्त होत असेल किंवा एखादे मूल घाबरत असेल, तर तो आनंद पुण्याचा कसा म्हणता येईल?

म्हणून अशा प्रसंगी समाजात जागृती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लग्नसमारंभ साधेपणाने, शांततेने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे केले गेले पाहिजेत. फटाके आणि मोठ्या आवाजातील डीजे याऐवजी प्रेम, संस्कार आणि आपुलकी यांना महत्त्व दिले पाहिजे. आनंद साजरा करावा, पण दुसऱ्याच्या वेदनेवर नाही. आज समाजाला दिखाव्याची नव्हे तर विवेकाची गरज आहे. मोठ्या आवाजात लग्न मोठे होत नाही; तर मोठ्या मनाने, दयाळूपणाने आणि संस्कारांनी ते खरे मंगलमय होते. पशुपक्ष्यांनाही जीव आहे, त्यांनाही भीती आणि वेदना जाणवतात, ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली पाहिजे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, आपण कोणत्याही चुकीच्या गोष्टीचे थेट कर्ते नसू शकतो; परंतु त्या चुकीला समर्थन देणे, तिचा आनंद घेणे किंवा शांतपणे स्वीकारणे यामुळेही नैतिक जबाबदारी आपल्यावर येते. म्हणून प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारावा — 'माझ्या आनंदामुळे कोणाला त्रास तर होत नाही ना?' जर हा विचार प्रत्येकाच्या मनात जागा झाला, तर समाज अधिक संवेदनशील बनेल, लग्नसमारंभ अधिक संस्कारित होतील आणि निसर्गाशी सुसंवाद राखणारी खरी मानवता जिवंत राहील.

**निवृत्ती तायडे,** हिवरखेड

# आदेश नाही, प्रेरणा देणारे नेतृत्व



*अमरावतीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रभावी नेतृत्वाची ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे डॉ. नितीन धांडे. संस्कार, शिस्त, दूरदृष्टी आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांच्या जोरावर त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. डॉ. नितीन धांडे यांचा जन्म अमरावती येथे एका प्रतिष्ठित व संस्कारी कुटुंबात झाला. वडील स्व. नानासाहेब धांडे हे जिल्हा परिषदेचे सलग दहा वर्ष अध्यक्ष होते, तर आई सौ. शालिनी धांडे यांनी माणुसकी, शिस्त आणि सामाजिक मूल्यांचे संस्कार दिले.*

बालपणापासूनच अभ्यासात प्रावीण्य मिळवत त्यांनी पुणे येथील नॅशनल मॉडर्न पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि पुढे नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. व एम.डी. शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय क्षेत्रात प्राध्यापक म्हणून कार्य करत असतानाच त्यांनी शिक्षण व्यवस्थापनातही उल्लेखनीय योगदान दिले. सन २०१४ पासून विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संस्थेच्या प्रगतीला नवे परिमाण दिले. आज त्यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षणापासून अभियांत्रिकी, फार्मसी, डेंटल व उच्च शिक्षणाच्या विविध शाखांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबत संशोधन, कौशल्य विकास आणि नवोपक्रम यांनाही त्यांनी तेवढेच महत्त्व दिले.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून संशोधन क्षेत्रात कार्य करत "Centraled Iia Reserrched Fouation", "Innovation & Entrepreneurship Development Centre" आणि "Atal Incubation Centre" सारखे महत्त्वपूर्ण उपक्रम त्यांनी उभे केले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती आणि स्टार्टअप संस्कृती विकसित करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजकारणातही त्यांची कार्यशैली तितकीच प्रभावी आहे. मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, ग्रामीण भागातील माती परीक्षण प्रयोगशाळा, कौशल्य विकास प्रकल्प यांसारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी समाजाशी असलेली नाळ कायम जपली. सामान्य माणसांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय करण्याची त्यांची शैली त्यांना इतरांपेक्षा वेगळे स्थान देते.

राजकीय क्षेत्रातही त्यांनी संघटन कौशल्य आणि सकारात्मक नेतृत्वाच्या जोरावर आपली छाप निर्माण केली. भाजपच्या विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आज ते अमरावती भाजप शहराध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणे, संवादातून नेतृत्व निर्माण करणे आणि प्रत्येकाला आपलेसे वाटेल अशी कार्यपद्धती हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे.

डॉ. नितीन धांडे यांचे व्यक्तिमत्त्व केवळ प्रशासकीय किंवा राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित नाही, तर ते संवेदनशील, कुटुंबवत्सल आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व आहे. म्हणूनच त्यांचे नेतृत्व आदेश देणारे नाही, तर प्रेरणा देणारे नेतृत्व म्हणून समाजात ओळखले जाते.

**डॉ. लोभस घडेकर**

# प्रचलित व्यवस्थेत बेरोजगार युवकांना भविष्य आहे का?

**अकोला :** देशाच्या प्रचलित व्यवस्थेत युवकांना रोजगाराचे काय भविष्य आहे हा प्रश्न देशातील युवकांना व युवतीना मोठ्या प्रमाणात भेळसावत आहे. त्याचे महत्त्वाचे कारण असे आहे,की कृषी प्रधान देशात शेती व्यवसाय सातत्याने प्रचलित व्यवस्थेत तोट्यात चालु असल्या मुळे शेती व्यवसायात रोजगाराची संधी असताना सुद्धा शारीरिक कष्ट जास्त घेऊन मजुरी मात्र इतर रोजगाराच्या तुलनेत अतिशय नाममात्र मिळते त्यामुळे गावातील उपलब्ध असलेले रोजगार यूवक? शेतीतील कामाचा कंटाळा करत शहरातील लहान मोठ्या उद्योगांच्या आधार घेत आपल्या कामाची गुणवत्तेची सिद्धता प्राप्त करण्याचा दृष्टीने तो शहरात रोजगाराची संधी शोध घेताना दिसत आहेत. पणं त्याला रोजगार प्राप्त होईल अशी अभिलाषा प्रचलित व्यवस्थेत कुठेच दिसत नाही. त्यामुळे युवक भ्रमीत झाला आहे त्याचा आत्मविश्वासवाढवा?. या अनुषंगाने शेती व्यवसायाला अधिक महत्त्व देऊन रोजगाराची उपलब्ध असलेल्या संधीची मजुरी त्या युवक व युवती चा गुणवत्ता नूसार मिळावी.जेणे करुण ?त्याला समाधान होईल.येवढी मजुरी प्राप्त झाली पाहिजे.यासाठी ग्रामीण व शहरातील औद्योगिक रोजगार ची तुलना करताना सरकार व शासन ज्या पद्धतीचा अवलंब करून फरक निर्माण केल्या जातो.उदा. ग्रामीण मजुराला अकुशल व शहरी मजुराला कुशल संबोधले जाते.यामधे मुल्य मापन चा जो फरक आहे.ती दरी खुप मोठी आहे.करीता. म्हणून देशात कामाची गुणवत्ता सारखी असताना सुद्धा भारत आणि इंडिया असे दोन भाग पडले आहे.म्हणून रोजगाराचे मुल्य मापनाची दरी समन्यायी असावी त्यामुळे शेती व्यवसायात शेतकऱ्यांची मुल व मुली मनापासून काम करतील.

**मनोज तायडे,**
कौलखेड जहांगिर

## दिन विशेष

### विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा दिवस




**आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन**

११ मे या दिवसाचे भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रात अनन्यसाधारण महत्व आहे. हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. आज भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात खूप प्रगती केली आहे. गेल्या काही काळात नव- नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने देशाने तंत्रज्ञान क्षेत्रात यशस्वीपणे अनेक शिखरे गाठली असून आज भारताचे नाव जगातील महत्वाच्या देशांमध्ये घेतले जाते. भारतात दरवर्षी ११ मे रोजी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसाचे देखील एक वेगळे महत्व असून हा दिवस आजच का साजरा करतात याला देखील एक रंजक इतिहास आहे.

भारतीय इतिहासात या दिवसाला खूप महत्त्व आहे. ११ मे १९९८ रोजी भारताने पोखरण अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडली होती. अशाप्रकारे, भारताने जागतिक स्तरावर एक महासत्ता म्हणून आपले नाव कोरले . जे जगातील भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठी खूप महत्वाचे ठरले. या दिवसाची आठवण म्हणून दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस देशासाठी खूप महत्वाचा आहे. ११ मे नंतर भारताने पोखरणच्या ५ अणुचाचण्या केल्या. भारताकडून प्रथमच, ११ मे १९९८ रोजी, भारताने राजस्थानमधील भारतीय सैन्याच्या पोखरण चाचणी श्रेणीत ऑपरेशन शक्ती अंतर्गत तीन यशस्वी अणुचाचण्या घेण्यात आल्या होत्या. यानंतर १३ मे रोजी आणखी दोन अणुचाचण्या घेण्यात आल्या. तर, उर्वरित चाचण्या डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या कारकिर्दीत पार पडल्या . त्या स्मरणार्थ ११ मे १९९९ रोजी प्रथमच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला.

या अणुचाचणीची संपूर्ण जबाबदारी 'मिसाईल मॅन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या एपीजे अब्दुल कलाम यांच्यावर होती. तसेच, तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी राजकीय इच्छाशक्ती दाखवली होती. या मोहिमेला ऑपरेशन शक्ती असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. हे एक गुप्त ऑपरेशन होते. ज्याची चाचणी जगाच्या नजरेपासून लपून करण्यात आली होती.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस. दरवर्षी याच दिवशी उत्साहात साजरा केला जातो. १९९८ साली आजच्याच दिवशी भारताने केलेल्या अणुचाचणीने आपल्या तंत्रज्ञानातील प्रगती जगाला दिसून आली. पोखरण अणुचाचणी तंत्रज्ञानातील प्रगतीचे प्रतीक म्हणून दरवर्षी 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस' साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रात शक्ती-१ या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली. दोन दिवसानंतर लगेचच, पोखरण-२ / ऑपरेशन शक्ती पुढाकाराचा एक भाग म्हणून यशस्वीपणे आणखी दोन आण्विक चाचण्या घेतल्या. या चाचण्यांमुळे भारत राष्ट्रांच्या 'न्यूक्लियर क्लब' मध्ये सामील होणारा सहावा देश ठरला आणि नॉन-प्रोलीफरेशन ऑफ न्यूक्लियर वेपन तहामध्ये भागीदार नसलेला प्रथम देश बनला. तसेच ११ मे १९९८ रोजी संरक्षण संशोधन आणि विकास संघटनाकडून 'त्रिशूल' क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. जे नंतर भारतीय लष्कर आणि भारतीय वायुसेनेत समाविष्ट करण्यात आले. कमी पल्ल्याचे, जलद-प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र 'त्रिशूल' हा भारतातील एकात्मिक गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता. देशाच्या या यशानंतर, भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस' घोषित केला. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो.

# सहकारातून समृद्धीकडे देशाला दिशा देणारी अकोल्याची सहकार चळवळ

***महाराष्ट्राला सहकाराची भूमी म्हणून ओळखल्या जाते देशातील सर्वाधिक सहकारी साखर कारखाने सहकारी पतसंस्था सहकारी बँका महाराष्ट्र राज्यात उदयाला आल्यात आणि प्रवरानगर जिल्हा अहमदनगर याच जिल्ह्यातून देशातील सर्वात पहिल्या सहकारी साखर कारखान्याची संकल्पना उदयाला आली आणि महाराष्ट्रात सहकार चळवळीचा श्री गणेशा झाला असे म्हणता येईल. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नाने प्रवरानगर येथे आशिया खंडातील पहिल्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याची ३१ डिसेंबर १९५० ला स्थापना झाली. आणि पश्चिम महाराष्ट्रात साखर उद्योगाला नवी चालना मिळाली त्यामुळेच विठ्ठलराव विखे यांचा उल्लेख सहकार महर्षी म्हणून केल्या जातो. आज महाराष्ट्रातील साखर उद्योग देश पातळीवर पोहचला असून याला कारणीभूत राज्यातील सहकाराचा झालेला उदय होय.***

महाराष्ट्र हे भारतातील सहकार चळवळीतील विस्तारीत राज्य असून त्यास प्रदिर्घ इतिहास आहे. सहकार हे महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावतो.महाराष्ट्रात २ लाख १८ हजार सहकारी संस्था आहेत. सहकारी संस्थाचा विचार करता महाराष्ट्र हे देशातील सर्वात विकसित राज्य आहे. महाराष्ट्रात क्वचितच एखादे खेडेगांव असेल ज्याला सहकारी चळवळीचा स्पर्श झाला नाही.महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीचा विकास त्रिस्तरीय रचनेमध्ये झालेला आहे.ज्याच्या अग्रभागी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मध्यम स्तरावर जिल्हा तळाशी प्राथमिक कृषी पतसंस्था आहेत.

सहकार क्षेत्रामुळेच अकोल्याला जागतीक पातळीवर ओळख मिळाली हे कधीही विसरून चालणार नाही.कापसाच्या खरेदी- विक्री व्यवहारासाठी १८८६ मध्ये 'हैदराबाद ॲक्ट'मधील तरतुदीचा अवलंब करीत तेंव्हाच्या अकोला व आताच्या वाशिम जिल्ह्यांतील कारंजा लाड येथे देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली कृषी बाजार समिती स्थापन करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना आपला कापूस विकण्यासाठी हक्काची जागा मिळाली.थेट व्यापाऱ्याला एकाच ठिकाणी सगळा कापूस विकता येवू लागला. बाजार समितीच्या नियमात राहूनच माल खरेदी करणं व्यापाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं. यामुळेच राज्यात जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचा विकास झाला. त्याकाळी अकोल्याची ओळख कॉटन सिटी म्हणून देशभरात होती या कारणाने कॉटन उद्योगासाठी अकोला शहराला जोडणारे रेल्वे मार्ग टाकण्यात आले. यवतमाळ, अमरावती- बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला,जळंब खामगाव, आर्वी-पुलगाव या रेल्वे मार्गाची निर्मिती झाली यामुळेच अकोला जिल्हा व विदर्भातील कापूस गाठी मुंबईच्या बंदरावर व तेथून मॅंचेस्टर- लॅंकेशायरच्या मिलसाठी नेण्याची व्यवस्था उभी झाली. हा इतिहास विसरता येणार नाही यामुळेच राज्यात सहकाराचे जाळे विणल्या गेले व ङसहकारातून समृद्धीकडेङ हे ब्रीद अधिक दृढ होण्यास मदत लाभली.

सहकार क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्र राज्यात असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समिती आहेत. मोठ्या व किरकोळ विक्रेत्यांकडून होणाऱ्या शोषणापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे एकाच ठिकाणी विविध व्यापारांच्या माध्यमातून त्यांच्या मालाला अधिक दर मिळावा व विश्वास पूर्ण व्यवहार व्हावे



या उद्देशाने शेतकरी व व्यापारी यांच्यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून सहकारी तत्त्वाने उभ्या झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्या भूमिका बजावत असतात.आपल्या कृषी मालाला योग्य भाव मिळेल या विश्वासामुळेच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणात कृषीमाल विक्रीसाठी घेऊन येत असतात.

शेतकऱ्यांसाठी पतपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था म्हणून महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्था व गावोगावी असणाऱ्या विविध कार्यकारी सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. महाराष्ट्रात ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि ३५० पेक्षा अधिक अर्बन को ऑपरेटिव्ह बँका सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांसाठी कार्य करीत आहेत. सहकार क्षेत्र अधिक समृध्द करण्यामध्ये अकोला जिल्ह्याचा उल्लेख अग्रस्थानी राहिला आहे.अकोल्यातील ११४ वर्षाच्या सेवेचा इतिहास लाभलेली दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील पहीली जिल्हा सहकारी बँक होय.या बँकेचे आरंभीचे नांव दि अकोला सेंट्रल अर्बन बँक अकोला असे होते.१९०८ मध्ये अकोला जिल्हयातील १२ प्रमुख समाजसेवी लोकांनी मिळून त्याकाळी अस्तित्वात असलेल्या १३ गावातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांना कर्ज पुरविणारी सेंट्रल बँक,अकोला येथे काढावी, असा ठराव केला.तशी नोंदणी करण्यासाठी रीतसर अर्जही केला. त्या काळात हेमिंग्वे सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार होते. त्यांनी ५ फेब्रुवारी १९०९ रोजी बँक रजिष्टर केल्याचे सर्टिफीकेट दिले.

भारतामध्ये १९०४ साली सहकारी पतपेढयांचा कायदा पास झाल्यावर अकोला जिल्हयात सन १९०८ पर्यंत वेगवेगळया १३ सहकारी संस्था स्थापन झाल्या होत्या. सहकाराची तत्वे आणि सहकारी संस्थांचे महत्व लोकांना पटवुन देण्यासाठी सरकारने खास प्रचारक नेमले होते. लोकांची मने सहकाराला अनुकूल करण्याचे पुष्कळसे काम के.पी.भट या अधिकाऱ्याने केले.शासनाकडून सहकारी चळवळीला नेहमीचं सहकार्य केले गेले. १९०८ साली अकोला जिल्हयात ज्या १३ सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.त्यांना संस्था चालवण्यासाठी लागणारा पैसा स्थानिक सावकारांकडून घ्यावा लागत असे. संस्थांच्या कार्याचा व्याप जसजसा वाढू लागला तसतशी पैसे देणारी एखादी केंद्रीय पेढी असण्याची गरज भासू लागली. त्यावेळी १३ सहकारी संस्थांचे चालक विचार करुन एकत्र जमले व अकोला जिल्हयासाठी को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक काढण्याचा निर्णय घेतला.

१९६० पासुन अकोला जिल्हयातील सहकारी चळवळीला विशेष गती मिळाली.राज्याचे माजी सहकार व कृषि राज्यमंत्री नानासाहेब सपकाळ हे १९५९ साली अकोला सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी तर रामराव झनक उपाध्यक्षपदी निवडून आले. त्यावेळी माजी आमदार शामराव देवराव धोत्रे हे मानद सचिव होते. तेव्हापासून बँकेची प्रगती अतिशय झपाटयाने झाली. शेतकरी मागतील तेवढा पैसा उपलब्ध करून देण्याची तयारी बँकेने दर्शविली. ग्रामीण भागात बँकेने वसुलीचाही उच्चांक मोडला. बँकेच्या या खास कामगिरीचे अवलोकन करण्याकरिता भारत सरकारचे सहकारमंत्री बी.एस.मूर्ती, महाराष्ट्राचे सहकारमंत्री बाळासाहेब भारदे व रजिस्ट्रार एल.एन.बोंगिरवार यांनी बँकेस भेट दिलेली आहे.

**विशाल बोरे,** पत्रकार, अकोला.

# साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि.११ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## अकोला मार्गे तिरुपती - छपरा विशेष फेरी

**अकोला :** उन्हाळ्यातील गर्दी लक्षात घेऊन तिरुपती छपरादरम्यान नांदेड-हिंगोली-वाशिम-अकोला मार्गे विशेष रेल्वे गाडीची एक फेरी चालविण्यात येणार आहे.

उन्हाळी सुट्टयांच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे तिरुपती आणि छपरा जंक्शनदरम्यान विशेष रेल्वेची एक फेरी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विशेष गाड्यांमुळे दक्षिण भारतातून उत्तर भारताकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. या भागातून तिरुपतीला जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच सुटीच्या दिवसात भाविक बालाजीच्या दर्शनासाठी तिरुपतीला जात असतात. त्यांचा विचार करून रेल्वे प्रशासनाने सोय उपलब्ध करून दिली आहे. भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एसटी महामंडळाच्या बदल्यांना बिंदूनामावलीचे ग्रहण

## कर्मचारी संघटनांच्या चुप्पीमुळे संताप !

प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नुकतेच बदल्यांबाबत नवीन धोरण जाहीर केले असले तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणीत मात्र अनेक तांत्रिक पेच निर्माण झाले आहेत.

एकीकडे बदल्यांसाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्याच्या सूचना आहेत, तर दुसरीकडे 'बिंदूनामावली' (कास्ट रोस्टर) आणि रिक्त पदांच्या अटींमुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मोठे 'ग्रहण' लागले असल्याचे चित्र दिसत आहे. सामान्य प्रशासन विभागाचे हे काम असून त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या दर तीन वर्षांनी होणाऱ्या बदल्या थांबल्या का आणि कोणी थांबविल्या असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचा रोष देखील विभागात वाढला आहे.



### चालक-वाहक एकाच ठिकाणी; प्रशासकीय नियोजनाचा फज्जा

महामंडळात सध्या एक विचित्र परिस्थिती पाहायला मिळत आहे. काही डेपोमध्ये चालक, वाहक आणि तांत्रिक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून आहेत. पत्रात 'प्रशासकीय बदल्यां'चा उल्लेख असला तरी, वशिल्याच्या जोरावर अनेक कर्मचाऱ्यांनी एकाच ठिकाणी आपले स्थान पक्के केले आहे. यामुळे दुर्गम भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बदली मिळणे कठीण झाले असून, विभागांतर्गत समतोल बिघडला आहे.

### बिंदूनामावलीची भीती अन् बदल्यांना खो

मध्यवर्ती कार्यालयाच्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की, प्रत्येक पदाची जात प्रवर्ग निहायस्थिती तपासूनच बदलीची कार्यवाही करावी. मात्र, प्रत्यक्षात अनेक विभागांत बिंदूनामावली अद्याप अद्ययावत नसल्याने किंवा विशिष्ट प्रवर्गाची पदे रिक्त नसल्याने कर्मचाऱ्यांचे विनंती अर्ज फेटाळले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासकीय सोयीसाठी याच तांत्रिक मुद्द्याचा वापर करून बदल्या टाळल्या जात असल्याचा आरोप कर्मचारी करत आहेत.

### कर्मचारी संघटनांची 'चुपकी' का ?

नेहमी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या एसटीतील कामगार संघटना या गंभीर विषयावर सध्या शांत का आहेत ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. बदल्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचे दिसत असतानाही संघटनांनी घेतलेली ही 'चुपकी' कर्मचाऱ्यांमध्ये संशय निर्माण करणारी ठरत आहे. अधिकृत मार्गाने बदल्या होण्यात अडचणी येत असल्याने आता 'एजंट' मार्फत बदल्यांची चर्चा सुरू झाली आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने बदलीस हरकत नसल्याचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय बदली होणार नाही, या अटीमुळे विभागांतर्गत फिरस्ती थांबली आहे.

### शिक्षा मिळाली की बदली सोपी

एसटी महामंडळाच्या या नवीन धोरणामुळे एक विचित्र विरोधाभास निर्माण झाला असून, प्रामाणिकपणे बदलीची प्रतीक्षा करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा 'पनिशमेंट' (शिस्तभंग किंवा प्रशासकीय कारवाई) झालेल्या कर्मचाऱ्यांनाच उलट फायदा होत असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. अशा 'पनिशमेंट' झालेल्या कर्मचाऱ्यांची पोस्टींग कुठे याचा अभ्यास जर विभागाने केला तर ते कर्मचारी सुखासुखी नोकरी करत असल्याचे चित्र असून त्यांच्या इच्छित स्थळी बदली त्यांना कशी मिळते असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## माऊंट कारमेलच्या समृध्दी ठाकुरचे सुयश




**अकोला :** स्थानिक माऊंट कारमेल हायस्कूलची विद्यार्थीनी समृध्दी विजयसिंग ठाकुर या विद्यार्थीनीने इयत्ता १० वी मध्ये ९० टक्के गुण घेवून सुयश प्राप्त केले.

## दिव्या मौंसारा तायडे ९० टक्के गुण



**अकोला :** श्रीमती इंदिरा देवी मोहनलाल खंडेलवाल मेमोरियल हायस्कूल अकोलाची दिव्या मौंसारा तायडे हीला ९० टक्के गुण

## मो. साद मो.अताउल्ला याला दहावीत ९१टक्के गुण



**मुर्तिजापूर :** लाखपुरी येथील युवा उद्योजक मो.अताउल्ला यांचा मुलगा मो. साद मो.अताउल्ला याला दहावी मध्ये ९१ ℅ गुण प्राप्त केले. मो. सादचे शिक्षण श्रीमती राम काकांनी एज्युकेशन अकॅडमी येथे झाले असुन हे यश संपादन करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. त्याच्या यशाचे श्रेय तो शिक्षक आणि आई-वडिलांना देतो.

## मुख्य टपाल कार्यालयाची वेळ आता सायंकाळी साडेसातपर्यंत

**अकोला :** नोकरदार, व्यावसायिक व विद्यार्थ्यांना कार्यालयीन वेळेतील अडचण, तसेच तीव्र तापमान लक्षात घेऊन बसस्थानकासमोरील अकोला मुख्य टपाल कार्यालयाची वेळ सायंकाळी ७.३० वा. पर्यंत वाढविण्यात आली आहे. टपाल सेवा संचालक डॉ. सुधीर जाखैरे यांच्या मार्गदर्शनात हा बदल करण्यात आला आहे.

या विस्तारित वेळेत बचत खात्यातील व्यवहार, नवीन खाते उघडणे, पोस्टाच्या सर्व बचतसंबंधीची कामे होतील. नोकरदार व इच्छुकांना कामावरून घरी परतताना आर्थिक व्यवहार पूर्ण करता येणे शक्य होणार आहे, अशी माहिती यांनी दिली.

## छत्रपती शाहू विद्यालय बोरमळीचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी ११ मे

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील छत्रपती शाहू विद्यालय बोरमळीचा १०० टक्के निकाल लागल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष अविनाश मखराम पवार, सचिव सतीश मखराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ९ मे ला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




विद्यालयातील यावर्षी दहावीच्या परीक्षेत २२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी मोहिनी संतोष घुबडकार हिने ८९ .८० ℅ टक्के मिळवले असून विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला तर ज्ञानेश्वर बाळू राठोड याने ८४.४०℅ मिळविले असून द्वितीय क्रमांक पटकाविला व संघर्ष अविनाश इंगळे याने ८३.२०℅ मिळविले असून तृतीय क्रमांक पाठविला आहे या विद्यालयाचे १८ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत तर ३विद्यार्थी प्रथम श्रेणी व १विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. माजी सरपंच बापुराव राठोड, चेलका येथील सरपंच अरविंद जाधव,जि प चे मुख्याध्यापक केशव मुसळे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप राठोड,ग्रा.पं. सदस्य स्वाती घुबडकार,क्रीडा शिक्षक नामदेव जाधव सर,कु एम जी धाय मॅडम, अतुल अरबाड यांच्या हस्ते आई-वडिलांसह विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला संतोष घुबडकार, अविनाश इंगळे, वनिता घुबडकर,उषा इंगळे शारदा बाळू राठोड यांची उपस्थिती होती. विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल लागल्यामुळे संस्थेचे अध्यक्षअविनाश पवार, सचिव सतीश पवार यांनी विद्यार्थी, व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रेखा कोल्हे, क्रीडा शिक्षक नामदेव जाधव, मयुरी धाये, विकेश पवार, राजेश येवले, सुशील कुमार शर्मा, अंकुश जाधव, समाधान राठोड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन मयुरी धाये मॅडम यांनी तर आभार नामदेव जाधव यांनी मानले.

## कुटासा परिसरात आढळली अजगराची अंडी?

### अजगर पकडला न गेल्याने नागरिकांमध्ये भीती

प्रतिनिधी ११ मे

**कुटासा :** अकोट तालुक्यातील कुटासा परिसरातील एका शेतकऱ्याच्या शेतात मादी अजगराने अंडी दिल्याची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, बराच प्रयत्न करूनही हा अजगर वनविभागाच्या हाती लागला नाही.

एका शेतकऱ्याच्या शेतात मादी अजगराने अंडी दिल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. या माहितीवरून वनविभागाच्या पथकाने अजगराला त्याच्या बिळातून पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु अजगर हाती न लागल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती पसरली आहे. येथील तलावाजवळ असलेल्या एका मोठ्या पाईपखाली हा महाकाय अजगर आणि त्याची अंडी दिसून आल्याने परिसरात एकच खळबळ माजली होती.



घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी अजगराला पकडण्यासाठी अथक परिश्रम घेतले, मात्र अजगर निसटून जाण्यात यशस्वी झाला. अजगराला पकडण्याचे वनविभागाचे प्रयत्न सुरूच होते. ही घटना पाहण्यासाठी गावातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, अजगर अद्याप पकडला न गेल्याने स्थानिक नागरिकांमध्ये साशंकता आहे.

## तालुक्यातून प्रथम येण्यासाठी त्या शाळेच्या संस्था चालकाची सेटिंगची चर्चा

प्रतिनिधी ११ मे

**मुर्तीजापुर :** आपले व आपल्या शाळेचे व संस्थेचे नाव मोठे व्हावे लोकांनी विश्वास ठेवण्याचे उद्देशाने आता वेगळीच माहिती चर्चेला समोर येत आहे तालुक्यातील प्रथम येण्यासाठी दिखावा करण्यासाठी संस्था चालकाची सेटिंग उच्च पातळीवर दिसून येत असल्याने चर्चा शहरात होत आहे.

नुकतेच दहावीचा निकाल जाहीर झालेला आहे या दहावीच्या निकालामध्ये आपल्या विद्यार्थ्यांचे गुण कोणत्या पद्धतीने वाढता येईल त्यासाठी नेहमी दरवर्षी सेटिंग केली जात आहे त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर नक्कीच होणार आहे अनुभव अभ्यास आणि परिश्रम हा महत्त्वाचा भाग असून जर याचात विद्यार्थ्यांचा भविष्य धोक्यात टाकून आपल्या संस्थेचा नाव मोठ्या करण्यासाठी प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी जे काही साम दाम दंड भेद प्रक्रिया आहे ती प्रक्रिया पूर्ण करण्याचा काम केल्या जात आहे संत गाडगे महाराज च्या नगरीने ओळखले जाणारे शहर आता या ना शोधणारे कामामुळे कुठे जात आहे हे खूप शोकांतिका आहे शहरात उच्च व चांगले शिक्षण मिळावा यासाठी शिक्षण संस्था खूप मेहनत घेत आहे रात्र दिवस विद्यार्थी वर मेहनत करत आहे परंतु त्याच्यातून ते शिक्षण संस्था संचालक शाळेची टीम नुसता सेटिंग करण्यास व्यस्त आहे विद्यार्थ्यांचा भविष्य धोक्यात टाकून त्याला पाच तर करून देणार पण भविष्यात येणारी समाजाचा सामना त्या विद्यार्थ्याला करावी लागणार आहे

## पाटसुल येथे सुसंस्कार शिबिराचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उदघाटन



प्रतिनिधी ११ मे

**कुटासा:** पाटसुल येथील श्री गुरुदेव सेवाश्रममध्ये आयोजित करण्यात आलेल्या सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते पार पडले. २ मे ते १२ जून या कालावधीत चालणाऱ्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांसह युवक-युवतींना नैतिक मूल्ये, संस्कार, शिस्त, अध्यात्म आणि व्यक्तिमत्व विकासाचे मार्गदर्शन केले जाणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास श्री गुरुदेव सेवाश्रमचे शुकदास महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अशा सुसंस्कार शिबिरांची आजच्या काळात मोठी गरज असल्याचे सांगितले. 'विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जपणूक, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक विचार निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे,' असे त्यांनी नमूद केले.शिबिरामध्ये योग, प्रार्थना, व्यक्तिमत्व विकास, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक जाणीव, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन तसेच राष्ट्रप्रेम यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

## जय विनोद वानखडेचा आ. रणधीर सावरकर यांच्या हस्ते सत्कार




प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** स्नॉट ऑलंपियाड मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये विविध विषयामध्ये चांदूर येथील जिप शाळेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. इयत्ता सहावीतील जय विनोद वानखडे राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. तर वैष्णवी वानखडे जिल्हास्तरीय गणित परीक्षेत यशस्वी झाली. ७ मे रोजी आमदार रणधीर सावरकर यांनी बहीण भावाचे कौतुक केले. तसेच भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आमदार रणधीर सावरकर यांनी जयचे वडील विनोद वानखडे यांचे देखील अभिनंदन केले. मुलांनी यशात सातत्य कायम ठेवावे असे आमदार सावरकर म्हणाले. शाळेतील एकूण ६३ विद्यार्थी जिल्हास्तर गुणवत्ता यादीत झळकले आहेत. जय याने इंग्लिश, सायन्स, मॅथ आणि जीके मध्ये नेत्रदीपक यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या नेत्रदीपक कामगिरीमुळे सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## हातगावातील समाधान शिबिरात तक्रारींचे निवारण

प्रतिनिधी ११ मे

**मूर्तिजापूर :** छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र समाधान शिबिर अभियानांतर्गत मूर्तिजापूर तालुक्यातील पाचवे शिबिर शुक्रवारी हातगाव येथील वसंतराव नाईक विद्यालयात उत्साहात पार पडले. विविध शासकीय योजना, महसुली सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार आणि तहसीलदार शिल्पा बोबडे यांच्या मार्गदर्शनात आयोजित या शिबिराच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार होते. ग्रामपंचायत हातगावचे प्रशासक अक्षय राऊत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

संचालन ग्राम महसूल अधिकारी राजेश खंडारे यांनी केले, आभार गिरीजादेवी लोखंडे यांनी मानले. यशस्वितेसाठी मंडळ अधिकारी रवींद्र पुरी, ग्राम महसूल अधिकारी भरत ढोरे, मनोज हिवराळे, वैशाली राऊत, कादंबरी खापरे, श्रीकांत डांगे, सचिन नवले, कृष्णा ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

### २० तक्रारींचा निपटारा

शिबिरात प्राप्त २० तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कूळ जमिनीच्या वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरणाची २ प्रकरणे, कलम १५५ अंतर्गत ३ दुरुस्ती प्रकरणे आणि ४४ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच १६१ डिजिटल सात-बारा व १६१ आठ-अ उतारे उपलब्ध करून देण्यात आले. विविध योजनांतर्गत एकूण २२७ प्रमाणपत्रे देण्यात आली.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
> इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
> इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
> शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
> अनुभवी शिक्षकवृंद
> सुसज्ज पायाभूत ईमारत
> दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
> सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
> आनंददायी शिक्षण पध्दती
> CCTV ची सुविधा
> कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
> सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ११ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री संजय राठोड



प्रतिनिधी ११ मे

**यवतमाळ :** दारव्हा शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करण्यात आला असून विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. दारव्हा येथे नवनिर्मित वंदनीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, बचत भवन आणि उच्च प्राथमिक शाळा इमारतीचे लोकार्पण तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमचे भूमिपूजन शनिवारी त्यांच्या हस्ते करण्यात आले.

नवनिर्मित क्रीडा संकुल येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख, जिल्हाधिकारी विकास मीना, उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर भोरे, तहसीलदार राजेंद्र पौळ, मुख्याधिकारी विठ्ठल केदारे, नगराध्यक्ष सुनील चिरडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री राठोड म्हणाले, राज्य सरकार विकासाच्या अजेंड्यावर काम करत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वात राज्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. दारव्हा शहरात टप्प्याटप्प्याने विविध विकासकामे पूर्ण करण्यात येत असून, ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम, व्यापाऱ्यांसाठी गाळे, उपजिल्हा रुग्णालयाचा कायापालट आणि दर्जेदार शाळांची उभारणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बचत गटांसाठी मोठा उद्योग आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. नव्याने उभारण्यात आलेल्या सुविधा नागरिकांनी जपून वापराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

**'क्रीडा संकुल युवा खेळाडूंना प्रेरणादायी' :** खासदार संजय देशमुख यांनी दारव्ह्यात उभारण्यात आलेल्या शासकीय वास्तूंना दिशादर्शक संबोधले. वंदनीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल हा युवा खेळाडूंना प्रेरणा देणारा मॉडेल प्रकल्प असल्याचे सांगत अशा सुविधा संपूर्ण जिल्ह्यात उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्ग आणि शकुंतला ब्रॉडगेज प्रकल्पाबाबतही माहिती दिली.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जिल्ह्यातील क्रीडा विकासकामांचा आढावा मांडला. कार्यक्रमात नगराध्यक्ष सुनील चिरडे यांनी मनोगत व्यक्त केले, तर मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांनी प्रास्ताविकातून विविध विकासकामांची माहिती दिली.

**स्पर्धा परीक्षेत यशस्वी २२ युवकांचा गौरव :** दारव्हा येथे सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेतून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या २२ युवक-युवतींची विविध शासकीय सेवांमध्ये निवड झाली आहे. या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# अवधूतवाडी पोलिसांची एनडीपीएसअंतर्गत कारवाई

## २.७ किलो गांजा जप्त, तिघांना अटक

प्रतिनिधी ११ मे

**यवतमाळ :** शहरासह परिसरात गांजा सेवन व अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यात तरुण पिढी अडकत असल्याच्या पार्श्वभूमीवर अवधूतवाडी पोलिसांनी एनडीपीएस कायद्यांतर्गत विशेष मोहीम राबवत धडक कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी सुमारे २.७ किलो गांजा जप्त करून तिघांना अटक केली आहे.

जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि सेवन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिले होते.

त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अवधूतवाडी पोलीस ठाण्याने विशेष मोहीम हाती घेतली.

पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सापळा रचून कारवाई करण्यात आली. यामध्ये अभिलेखावरील हिस्ट्रीशीटर आरोपी राजू बाबूलाल कनोजे (रा. आंबा नगर) याच्याकडून १२४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. तसेच बाबू उर्फ केशव महादेवराव शिरभाते आणि वसंता गुलाबराव भिसे (दोघेही रा. माथा कळंब) यांच्याकडून सुमारे २६०० ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज जगताप, पोलीस हवालदार सुरेश मेश्राम, विशाल भगत, बलराम शुक्ला, मोहम्मद भगत, वाले, भुसारी, गजानन दूधकोहळे, राज कांबळे, योगेश चोपडे, सचिन राठोड तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

> ■ या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# मातृशक्तीचा सन्मान हीच खरी संस्कृती – जंगलु पारखी

प्रतिनिधी ११ मे

**वणी :** "जिथपर्यंत आई आहे, तेव्हापर्यंत मुलीला माया आणि मुलाला बालपण असते. ज्या घरात स्त्रीचा सन्मान होतो, त्या घरात आनंद नांदतो," असे प्रतिपादन ज्येष्ठ वक्ते जंगलु पारखी यांनी केले.

'माझं गाव माझा वक्ता' या व्याख्यानमालेच्या ५६ व्या पुष्पात नगर वाचनालय, वणी येथे आयोजित कार्यक्रमात ते "जिच्या हाती पाळण्याची दोरी" या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर वाचनालयाचे सचिव गजानन कासावार होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मातृशक्तीचे महत्त्व अधोरेखित करणारे गीत विजय गंधेवार यांनी सादर केले. आपल्या प्रभावी भाषणात जंगलु पारखी यांनी आईचे प्रेम, त्याग आणि स्त्रीचे कुटुंबातील स्थान यावर भावनिक शब्दांत प्रकाश टाकला. "आई सर्वात आधी उठते आणि सर्वांत उशिरा झोपते, मात्र तिच्या वेदना कुणालाच दिसत नाहीत. स्त्रीचा सन्मान तिच्या जिवंतपणीच व्हायला हवा," असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात गजानन कासावार यांनी आईचे महत्त्व अधोरेखित करताना, "प्रत्येक मुलाला इतरांपेक्षा नऊ महिने अधिक ओळखणारी व्यक्ती म्हणजे आई. त्यामुळे आईची मूर्ती सर्वांपेक्षा वेगळी आहे," असे सांगितले. तसेच त्यांनी कवींच्या ओळी उद्धृत करत "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" या भावनेतून आईचे श्रेष्ठत्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अभिजित अणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक सोनटक्के यांनी मानले. कार्यक्रमाला नागरिक व साहित्यप्रेमींची उपस्थिती होती.

# पिक विम्यासाठी कोट्यवधी भरले, २३ हजार शेतकरी लाभापासून वंचित

प्रतिनिधी ११ मे



**उमरखेड :** अतिवृष्टी, महापूर आणि ढगफुटीसदृश पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होऊनही उमरखेड तालुक्यातील २३ हजार ८०७ शेतकऱ्यांना पिक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाकडे कोट्यवधी रुपयांचा पिक विमा भरल्यानंतरही मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील वर्षी ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उमरखेड तालुक्यातील हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. अनेक भागांत शेती मातीसह वाहून गेली, तर नदी-नाल्यांच्या काठावरील शेतांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने सोयाबीन, कापूस, हळद आणि ऊस पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी झाली.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी सुमारे ३ कोटी २९ लाख ७९ हजार रुपयांचा पिक विमा भरला होता. उमरखेड तालुक्यातील एकूण शेती क्षेत्र ३० हजार ८९६.९२ हेक्टर इतके आहे. नैसर्गिक संकटामुळे मोठे नुकसान होऊनही उमरखेडसह यवतमाळ जिल्ह्याला पिक विम्याच्या लाभातून वगळण्यात आल्याचा आरोप शेतकरी वर्गातून केला जात आहे.

जिल्ह्यात महायुती सरकारचे तीन मंत्री असूनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याची भावना व्यक्त होत आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी आणि नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असताना शासनाकडून कोणताही दिलासा मिळत नसल्याने नाराजी वाढली आहे.

उमरखेड विधानसभा मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, येथील हजारो शेतकऱ्यांना पिक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याने शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# पेट्रोल-डिझेलचा तुटवडा; चालक त्रस्त, ग्राहकांनाही फटका

प्रतिनिधी ११ मे

**महागाव :** तालुक्यातील विविध कंपन्यांचे सुमारे 12 पेट्रोल पंपावर गेल्या काही महिन्यापासून डिझेल व पेट्रोलचा नियमित पुरवठा होत नसल्याने पेट्रोल पंप चालकासमोर मोठे संकट उभे राहिले आहे कंपन्याकडून वेळेवर इंधन उपलब्ध होत नसल्यामुळे ग्राहकांना निर्माण होणाऱ्या मर्यादित स्वरूपात इंधन वितरण करावे लागत असून अनेक ठिकाणी नो पेट्रोल डिझेलचे फलक लावण्याची वेळ पंप चालकावर आली आहे.

इंदनपुर गोठ्यातील विस्कळीतपणामुळे वाहन चालकांनाही मोठा खर्च बसत आहे अचानक इंधन संपल्यामुळे अनेकांना एका पंपावरून दुसऱ्या पंपावर भटकंती करावी लागत आहे विशेषत शेतकरी प्रवासी वाहन चालक व मालवाहतूकदार यांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे शासनाच्या नियमानुसार पेट्रोल पंप चालकांना आपत्कालीन परिस्थितीसाठी सुमारे दहा टक्के डिझेल व पेट्रोल शिल्लक ठेवणे बंधनकारक आहे.

त्यामुळे उपलब्ध साठ्यातूनच ग्राहकांना मर्यादित प्रमाणात इंधन द्यावे लागत आहे जास्त प्रमाणात डिझेल पेट्रोलची मागणी करणाऱ्या वाहन चालकांना नियमाप्रमाणे इंधन वाटप करण्यात येत असल्याचे अनेक पेट्रोल पंप चालकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले कंपन्याकडूनच वेळेवर इंधन मिळत नसेल तर ग्राहकांची मागणी पूर्ण कशी करायांची असावा पेट्रोल पंप चलकाकडून उपस्थित केल्या जात आहे इच्छाशक्ती असूनही वेळेवर इंधन पुरवठा होत नसल्याने ग्राहकांच्या रोशालाही सामोरे जावे लागत असल्याची खंत अनेक पंपचालकांनी व्यक्त केली.

# सनराईज विद्यालयाचा दहावीचा शंभर टक्के निकाल; श्रावणी हुंबाड शाळेत प्रथम

प्रतिनिधी ११ मे



**आर्णी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या सन २०२५-२६ च्या एसएससी परीक्षेच्या निकालात सनराईज विद्यालयाने यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

यंदाच्या परीक्षेत श्रावणी हुंबाड हिने ९४.६० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. दिव्यांशी गुप्ता आणि सान्वी भोयर यांनी प्रत्येकी ९४.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. श्रुती माहुरे हिने ९३.८० टक्के गुणांसह तृतीय, समीक्षा काकरवार हिने ९३.४० टक्के गुणांसह चौथा, तर त्रिशा चिंतावार हिने ९३.२० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला.

शाळेतील एकूण ७६ विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले. तसेच ३६ विद्यार्थी ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झाले. ६७ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत गुणवत्ता श्रेणी प्राप्त केली, तर ७४ विद्यार्थ्यांनी ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत प्रथम श्रेणीत यश मिळविले. विशेष म्हणजे, सर्वात कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यालाही ५६ टक्के गुण प्राप्त झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे, मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे, उपमुख्याध्यापकांचे, ट्रस्टी मंडळाचे आणि पालक संघ सदस्यांचे मुख्याध्यापक डॉ. अशोक कोठारी यांनी अभिनंदन केले.

# सिलिंडरचा अवैध साठा; पुरवठा विभागाची धाड

प्रतिनिधी ११ मे

**यवतमाळ :** तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने वाघापूर रोडवरील वैशाली नगरातील चव्हाण गॅस शेगडी रिपेरिंग या दुकानात शनिवारी धाड टाकली. यावेळी गॅसची अवैध साठवणूक व रिफलिंगचा प्रकार उघडकीस आला.

त्यानंतर आरोपीलाला ताब्यात घेऊन २० सिलिंडर जप्त करीत गुन्हे दाखल केले. वाघापूर परिसरात आरोपी कैलास हरिसिंग चव्हाण (वय ५० रा. वैभवनगर) हा गॅस सिलिंडर रिफिलिंग आणि साठवणूक करीत असल्याची माहिती पुरवठा विभागाला मिळाली. त्यावरून पथकाने घटनास्थळ गाठून धाड टाकली. यावेळी दुकानातून पाच किलो वजनाचे १५ सिलिंडर किंमत १८ हजार, १४ किलो वजनाचे पाच सिलिंडर किंमत १० हजार असा २८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

निरीक्षण अधिकारी नीलेश कळसकर यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांच्या मार्गदर्शनात निरीक्षण अधिकारी निलेश कळसकर, पुरवठा निरीक्षक सिमा दोंदल, महसूल सहायक विष्णू डोळसे, नरेंद्र राजपूत आदींनी केली.

# प्रियकरासाठी पत्नी उठली पतीच्या जीवावर

## विजेचा शॉक देऊन आखला हत्येचा कट

प्रतिनिधी ११ मे

**यवतमाळ :** अनैतिक संबंधात पती अडसर ठरत असल्याच्या संशयातून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीच्या हत्येचा कट रचल्याची धक्कादायक घटना कळंब तालुक्यातील पंगडी येथे उघडकीस आली आहे. झोपेत असलेल्या पतीला विजेचा शॉक देऊन ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याप्रकरणी वडगाव जंगल पोलिसांनी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक केली असून न्यायालयाने त्यांना कारागृहात पाठविले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन वसंता मोरे (३८, रा. पंगडी, ता. कळंब) यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांच्या पत्नी कवडी गजानन मोरे (३५) हिचे गावातीलच विष्णु कडू आत्राम (४५) याच्याशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. या संबंधात पती अडसर ठरत असल्याने दोघांनी मिळून त्यांना संपविण्याचा कट रचल्याचे तपासात समोर आले.

या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) व ६१(२) अंतर्गत गुन्हा नोंदविला. तपासादरम्यान घटनास्थळावरून विद्युत वायर व ॲल्युमिनियम तार जप्त करण्यात आली. त्यानंतर आरोपी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची कारागृहात रवानगी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भाऊराव बोकडे करीत असून उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने व ठाणेदार विकास दांडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

> ■ ३ मे रोजी मध्यरात्रीनंतर सुमारे २ वाजताच्या सुमारास गजानन मोरे हे घरात झोपलेले असताना पत्नीने विद्युत वायरला ॲल्युमिनियमची तार जोडून त्यांना विजेचा शॉक देत ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या घटनेतून बचावल्यानंतर मोरे यांनी वडगाव जंगल पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# ३० वर्षांनंतर दहावी उत्तीर्ण; लता कोठारे यांचा 'जय मल्हार'कडून गौरव

प्रतिनिधी ११ मे



**यवतमाळ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त 'जय मल्हार अधिकारी कर्मचारी संघटना'तर्फे आयोजित साप्ताहिक पूजन उपक्रमाच्या दुसऱ्या पर्वातील ५०वे पूजन रविवारी (दि. १० मे) सायंकाळी म. फुले चौक, आझाद मैदान परिसरात उत्साहात पार पडले.

यावेळी तब्बल ३० वर्षांच्या खंडानंतर दहावीची परीक्षा उत्तीर्ण होत शिक्षणाचा ध्यास जपणाऱ्या लता विनोद कोठारे यांचा संघटनेतर्फे विशेष गौरव करण्यात आला. वयाच्या चाळिशीतही शिक्षण पूर्ण करण्याचा त्यांचा निर्धार उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमास पवन थोटे, सुरेश भावेकर, वसंत ढोक, प्रदीप पुनसे, सुनील सोडगीर, विष्णू गाडेकर, विजय शिंदे, जितेंद्र सातपुते, प्रा. आनंद भुसारी, सचिन भेंडे यांच्यासह टीना लामटे, काजल खोडके, साक्षी राठोड, रिया कानंदे, कार्तिका ठोकळ, सुहानी चाणेकर, पूनम खोडके, सोनम खोडके, नेहा वकलकर, संध्या खटारे, अनुष्का ठोकळ, गौरी राऊत, जान्हवी परचाके, कांचन कुलारे, माधवी राजे, शोभा पुनसे, श्रेया शिंदे आदी समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीजचोरीविरोधात महावितरणची धडक मोहीम; वर्षभरात ६,४२२ प्रकरणांचा पर्दाफाश

प्रतिनिधी ११ मे

**यवतमाळ :** वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणने अमरावती परिमंडळात विशेष मोहीम तीव्र केली असून, गेल्या वर्षभरात ६ हजार ४२२ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणण्यात आली आहेत. या प्रकरणांमध्ये संबंधित ग्राहकांवर तब्बल २० कोटी ७५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. परिमंडळ वीजचोरीमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आल्याची माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली.

वीजचोरीमुळे वीज वितरण व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येत असून, सुरळीत वीजपुरवठ्यावर त्याचा परिणाम होत असल्याने यापुढे कारवाई अधिक कठोर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**२२३ भरारी पथके मैदानात**

## दरमहा २,४०० प्रकरणांवर कारवाईचे उद्दिष्ट

> ■ परिमंडळातील प्रत्येक विभागाला दरमहा किमान ३०० वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांतील प्रत्येकी चार विभाग अशा एकूण आठ विभागांमार्फत दरमहा २,४०० प्रकरणांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक विभागाने वीजचोरी प्रकरणांतून दरमहा सुमारे तीन कोटी रुपयांचा महसूल वसूल करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.



वीजचोरीविरोधातील मोहिमेसाठी परिमंडळात एकूण २२३ भरारी पथके कार्यरत करण्यात आली आहेत. यात २१० शाखा कार्यालयांची पथके, आठ विभागीय पथके, सुरक्षा व अंमलबजावणी विभागाची तीन पथके आणि स्काडा विभागाची दोन पथके सहभागी आहेत.

**इतर जिल्ह्यांतील पथकांचीही मदत :** मोहिमेला अधिक गती देण्यासाठी नागपूर परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यांतील भरारी पथकांची मदत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी उपसंचालक, सुरक्षा व दक्षता विभाग, नागपूर परिक्षेत्र यांना पत्र पाठवून अतिरिक्त पथके उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. वीजचोरीमुक्त परिमंडळ मोहिमेच्या नियोजनासाठी मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी सुरक्षा व दक्षता विभाग तसेच स्काडा विभागाच्या भरारी पथकांसोबत बैठक घेतली.

### 'वीजचोरी हा दंडनीय गुन्हा'

> ■ वीजचोरी हा दंडनीय गुन्हा असून, अनधिकृत वीजवापरामुळे यंत्रणेवर अतिरिक्त भार पडतो. परिणामी वीजपुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांनी वीजचोरी टाळून तपासणीसाठी येणाऱ्या पथकांना सहकार्य करावे. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला.

सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. ११ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# उत्सव यात्रेत चाकू हल्ल्यात एका व्यावसायिकाचा मृत्यू

**◆ अमरावतीत खळबळ ◆ एका आरोपीला अटक, पैशांचा वाद आणि जुन्या वैमनस्याच्या प्रकरणाचा तपास**

प्रतिनिधी ११ मे

**अमरावती :** अमरावतीतील सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सायन्स कोअर ग्राऊंडवर आयोजित उत्सव जत्रेत झालेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे.

७ मे रोजी गुरुवारी दुपारी जत्रेत झालेल्या वादात गंभीर जखमी झालेले व्यावसायिक आणि जत्रेचे आयोजक अभिजीत कर (वय ५४, रा. कोलकाता) यांचा शुक्रवारी रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे जत्रेत गोंधळ उडाला आणि प्रशासनाने शुक्रवारी रात्री सुमारे ८ वाजता जत्रा बंद केली.

पोलिसांनी आरोपी अझीझ खान युसूफ खान (वय ३८, रा. रतनगंज) याला अटक केली आहे. सुरुवातीला हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता, परंतु अभिजीत कर यांच्या मृत्यूनंतर आता या प्रकरणात हत्येचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार, तामरेझ आलम इक्बाल (वय ५०, इक्बालपुरा, रुरकी, उत्तराखंड), जत्रेत झोपाळा चालवण्याचे काम करतात.



गुरुवारी दुपारी सुमारे दीड वाजता, आरोपी अझीझ खान त्याच्या काही मजुरांसह जत्रेत आला आणि आयोजकांपैकी एक असलेल्या अभिजीत कर यांच्याशी वाद घालू लागला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, शिवीगाळ केल्यानंतर आरोपीने कमरेतून चाकू काढून अभिजीत कर यांच्या पोटात वार केला.

ते गंभीर जखमी झाले आणि त्यांच्या शरीरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला.

घटनेनंतर लगेचच, उपस्थित लोकांनी आणि मजुरांनी त्यांना सावदेकर रुग्णालयात दाखल केले, जिथे शुक्रवारी रात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून इतर संशयितांच्या भूमिकेचा तपास करत आहेत. जत्रेत आधीच वाद निर्माण झाला होता. स्थानिक सूत्रांनुसार, जत्रेच्या सुरुवातीपासूनच वाद आणि तणावाचे वातावरण होते. वादावादी, छळ आणि धमक्यांच्या अनेक घटना घडल्या होत्या. गुरुवारी झालेला चाकू हल्ला हा त्या जुन्या वादातूनच झाला असावा, अशी चर्चा आहे.

या घटनेनंतर सर्वात मोठा प्रश्न सुरक्षेच्या व्यवस्थेबद्दल उपस्थित झाला आहे. हजारो लोकांना आकर्षित करणाऱ्या राजना जत्रेच्या घटनास्थळाजवळ सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. परिणामी, पोलिसांना तपासात अडचणी येऊ शकतात. आर्थिक व्यवहार आणि करारांवरून वादसूत्रांनुसार, पुण्यातील रहिवासी असलेल्या कुंदन लखिना यांना सुरुवातीला सायन्स कोअर मैदानावर उत्सव जत्रा भरवण्याची परवानगी देण्यात आली होती.

नंतर, अमरावतीतील रहिवासी असलेल्या रहीम नावाच्या व्यक्तीला दुसऱ्या महिन्यासाठी जत्रा चालवण्याची परवानगी देण्यात आली. सुरुवातीच्या आयोजकांमध्ये कुंदन लखिना, त्यांची पत्नी पारुल लखिना आणि मृत अभिजीत कर यांचा समावेश होता.

नंतर रहीमसोबत तडजोड झाली आणि आरोपी अझीझ खान हा देखील जत्रेत आर्थिकदृष्ट्या सामील झाला. याच काळात हिशोब आणि आर्थिक व्यवहारांवरून वाद अधिकच वाढला. या हत्येमागे आर्थिक स्पर्धा, दबाव किंवा मोठा कट होता का, याचाही पोलीस आता तपास करत आहेत.

हल्ल्याची बातमी मिळाल्यानंतर अभिजीत कर यांची पत्नी आणि दोन मुले शुक्रवारी दुपारी अमरावतीला पोहोचले. मात्र, सायंकाळी उशिरा त्यांच्या मृत्यूच्या बातमीने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मिळालेल्या माहितीनुसार, अभिजीत कर हे अनेक वर्षांपासून देशभरात उत्सव आणि जत्रा आयोजित करण्याच्या व्यवसायात होते आणि व्यावसायिक जगात सुप्रसिद्ध होते. कुटुंबाने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी सांगितले की, सर्व बाबी विचारात घेऊन तपास सुरू आहे.

# पहाटेच्या भीषण आगीत तीन कुटुंबांचा संसार बेचिराख

**वरुडच्या आठवडी बाजार परिसरातील दुर्घटना; तहसील प्रशासनाकडून तातडीची मदत, सामाजिक संघटनांनीही पुढे येण्याची गरज**

प्रतिनिधी ११ मे



**वरुड:** वरुड शहरातील प्रभाग क्रमांक ४, आठवडी बाजार परिसरातील केदारेश्वर मंदिराजवळ रविवारी पहाटे भीषण आग लागून तीन कुटुंबांचे संसार पूर्णतः जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली. पहाटे चार वाजताच्या सुमारास लागलेल्या या आगीत फुलाबाई शिरसाम, भातुलकर तसेच अन्य एका कुटुंबाचे घर काही क्षणांत आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या दुर्घटनेत किरकोळ इजा झाली असली तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग एवढ्या वेगाने पसरली की घरातील कपडे, धान्य, भांडी, फर्निचर, महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर जीवनावश्यक वस्तू पूर्णतः जळून खाक झाल्या. अनेक वर्षांच्या कष्टाने उभा केलेला संसार काही क्षणांत राख झाल्याने आगग्रस्त कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्रशासनाकडून घटनेची चौकशी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. पहाटेच्या सुमारास अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्यानंतर नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती.

दरम्यान, तहसील प्रशासनाने तातडीने मदतीचा हात पुढे केला आहे. तलाठी विपिन पेठे व पवार यांनी घटनास्थळी भेट देत आगग्रस्तांना काही जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या. प्रशासनाकडून मिळालेल्या या मदतीमुळे आगग्रस्तांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी ‡उर्वरित आयुष्य कसे जगावे?‡ असा हृदयस्पर्शी प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था, दानशूर नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन आगग्रस्तांना आर्थिक व वस्तुरूप मदत करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शासनानेही युद्धपातळीवर पंचनामा करून तातडीची आर्थिक मदत, घरकुल योजना आणि जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या भीषण आगीत तीन कुटुंबांचे आयुष्य अक्षरशः उद्ध्वस्त झाले असून आता समाजाने संवेदनशीलता दाखवत मदतीचा हात पुढे करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# समग्र शिक्षक आंदोलनकर्ते विजय दामले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

प्रतिनिधी ११ मे

**अमरावती :** समग्र शिक्षक आंदोलनकर्ते विजय दामले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. अमरावतीत राहत्या घरी त्यांचे निधन झाले आहे. समग्र शिक्षा संघर्ष समिती आपल्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदान येथे ते आंदोलन करत आहे. आज त्यांचा आंदोलनाचा ६४ वा दिवस असून आंदोलनकर्ते विजय दामले यांना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. ६१ दिवस झालं आंदोलन करुन तरी सरकार न्याय देईना, या तणावात हृदय विकाराचा झटका आल्याचा आरोप संघटनेनं केला आहे.

समग्र शिक्षा संघर्ष समिती आपल्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदान येथे आंदोलन करत आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा ६४ वा दिवस असून आंदोलनकर्ते विजय दामले यांना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. समग्र शिक्षा अभियानात कंत्राटावर असलेल्या उर्वरित १३ केडरच्या कर्मचाऱ्यांना कायम करावे यासाठी आंदोलन करण्यात येत आहे.



विजय दामले हे अशाच हजारो कर्मचाऱ्यांच्या वेदनेचे प्रतीक होते. ते केवळ आंदोलनातील एक चेहरा नव्हते, तर संघर्षाला जिवंत ठेवणारी ताकद होते. सर्वांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची वृत्ती, सहकाऱ्यांबद्दलची आत्मीयता आणि हक्कासाठी लढण्याची जिद्द आजही डोळ्यासमोर उभी राहते. आज त्यांच्या जाण्याने मनात एकच प्रश्न घोंगावत आहे. आणखी किती विजय दामले या व्यवस्थेच्या असंवेदनशीलतेचे बळी ठरणार? शासनाने आता तरी जागे व्हावे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अश्रूंना, वेदनांना आणि संघर्षाला समजून घ्यावे. समान काम, समान वेतन’ या न्याय्य तत्वाची अंमलबजावणी करून त्यांना कायम सेवेत सामावून घ्यावे. कारण कै. विजय दामले यांना खरी श्रद्धांजली ही केवळ शब्दांतून नाही, तर हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आयुष्याला स्थैर्य देणाऱ्या निर्णयातूनच मिळेल असे डॉ. नितीन टाले म्हणाले.

# समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या नवीन रस्त्याची आ. रवी राणा यांनी अधिकाऱ्यांसह केली पाहणी

प्रतिनिधी ११ मे

**अमरावती:** शहर व परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि प्रगतीच्या दृष्टीने मोठी झेप ठरणारा दस्तूर नगर ते समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या सुमारे ८४० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पाची पाहणी आमदार रवि राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह केली.

अमरावती शहरातील दस्तूर नगर चौकातून सुरू होणारा हा प्रस्तावित मार्ग हनुमान गडी, भानखेड, लालखेड (अंबुजा सिमेंट – अदानी प्रकल्प परिसर), मालखेड, वडगाव जिरे, मांजरी, खिरसाना, निरसाना, सावरेन, मोखड आणि नांदगाव खंडेश्वर या महत्त्वाच्या गावांमधून जात थेट समृद्धी महामार्गाला जाऊन



मिळणार आहे. या रस्त्यामुळे शहर व ग्रामीण भागातील दळणवळण अधिक वेगवान व सुलभ होणार असून वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. या पाहणीदरम्यान आमदार राणा यांनी अधिकाऱ्यांना कामाच्या गुणवत्तेबाबत विशेष सूचना देत नियोजनबद्ध आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर दिला. स्थानिक नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन रस्त्याची रचना करण्यात यावी, तसेच भविष्यातील वाहतुकीचा विचार करून सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना रवि राणा म्हणाले की, समृद्धी महामार्गाला जोडणारा हा रस्ता केवळ वाहतुकीचा मार्ग नसून संपूर्ण परिसराच्या आर्थिक, औद्योगिक आणि कृषी विकासाला चालना देणारा प्रगतीचा महामार्ग ठरणार आहे. या प्रकल्पामुळे गुंतवणूक वाढेल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल.

या महत्त्वाच्या प्रकल्पाला शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळेच मंजुरी मिळाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि अमरावतीचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी असे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. एकूणच, हा रस्ता प्रकल्प अमरावतीच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धातखेडा बंधाऱ्यात चार जणांचा बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

प्रतिनिधी ११ मे

**अमरावती :** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील गोडे कॉलेजच्या मागील बाजूस असलेल्या धातखेडा बंधाऱ्यात चार जण बुडाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

मृतांमध्ये दोन युवक व दोन युवतींचा समावेश असल्याची माहिती मिळत असून, हे सर्व जण खोलापुरी गेट पोलीस ठाणे परिसरातील असल्याचे सांगितले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी कार्यालयाची डीआरएफ टीम घटनास्थळी रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

सदर घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. मौजा घातखेडा येथिल तलावात सोनाली नरेंद्र जोशी वय अंदाजे १६, आदीत्य नरेंद्र जोशी वय अंदाजे १२, पायल बबलू पंडीत वय अंदाजे २१ , यश गजानन काकणे वय अंदाजे १३ रा. खोलापूरी गेट परीसर अमरावती यांचा बुडून मृत्यू झाला आहे.

तलावात सेल्फी काढण्यासाठी दिलेल्या या मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही प्राथमिक माहिती समोर आली आहे. तलावात फोटो किंवा सेल्फी काढत असताना, प्रथम एक व्यक्ती घसरून बुडू लागली, दुसरी व्यक्ती तिला वाचवायला गेली, तेव्हा दुसरी व्यक्तीही तिच्यासोबत बुडू लागली, त्यानंतर तिसरी व्यक्तीही बुडाली, आणि नंतर तिला वाचवण्याच्या प्रयत्नात चौथी व्यक्तीही बुडाली, अशी ही प्राथमिक माहिती आहे.

# खोलापुरी गेट हद्दीमधील खुनाचा गुन्हा तात्काळ उघडकीस

प्रतिनिधी ११ मे

**◆ एक आरोपी व एक विधीसंघर्षीत बालक ताब्यात**

**अमरावती:** खोलापुरी गेट हददीमधील खुनाचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणून एक आरोपी व एक विधीसंघर्षीत बालक ताब्यात घेण्यात शहर गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे.

दिनांक १०/०५/२०२६ रोजी नियंत्रण कक्ष येथे माहीती प्राप्त झाली कि पोलीस स्टेशन खोलापुरी गेट हददीमधील पार्वतीनगर रेल्वे कॉसींगच्या पलीकडील परीसरात खुन झाल्याची माहीती प्राप्त झाल्याने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन सदर मृतकाबाबत माहीती घेतली असता मृतकाचे नाव रवी ईश्वर राजुरकर, वय ५० वर्ष, रा. स्वाभीमान नगर, अकोली रोड, अमरावती



असे असल्याचे माहीती झाले.

गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन मृतकाची ओळख पटवुन खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन गोपनीय बातमीदाराकडुन माहीती प्राप्त करुन तात्काळ एक आरोपी व एक विधीसंघर्षीत बालक यांना स्वाभीमाननगर, अकोली रोड येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता जुन्या वादाच्या कारणावरुन हाताबुक्कीने तसेच डोक्यावर मडक्याने मारहाण करुन जीवानीशी ठार मारल्याचे निष्पन्न झाले वरुन नमुद आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांना पुढील कार्यवाहीकरीता पो स्टे खोलापुरी गेट यांच्या ताब्यात देण्यात आले आहे

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आकाश जगन्नाथ खोरगडे, वय २५ वर्ष, रा. स्वाभीमाननगर, अकोली रोड, अमरावती असे आहे सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि. मनिष वाकोडे, सपोनि. महेश इंगोले, सपोनि दशरथ आडे, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार-सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, सचिन बहाळे, मंगेश परिमल, आस्तिक देशमुख, जहीर शेख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, संभाजी केंद्रे, नापोका विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, पोका विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, चालक चेतन शर्मा यांनी केली.

# अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद

प्रतिनिधी ११ मे

**◆ पत्र परिषदेमध्ये एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांची माहिती**

**अमरावती:** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कार्यरिटद्वारे अव्यावसायिक स्पर्धेविरोधात २० मे २०२६ रोजी औषध विक्रेत्यांचा बंद पुकारला आहे. अशी माहिती हॉटेल प्राईम पार्क इथे पार पडलेल्या द महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन तर्फे आयोजित पत्र परिषदेमध्ये ए आय ओ सी डी चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी दिली.



औषधी व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act 1940 व ॅल्त १९४५ अंतर्गत चालवला जातो. ऑनलाईन औषध बिक्री बाबत Drugs and Cosmetics Act मध्ये कोणतीही तस्तुद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबत GSR 817(E) 28.08.2018 अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले होते. परंतु त्याचे अद्याप कायद्यात रुपांतर झालेले नसतानाही देशभरात सर्रासपणे बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. याबाबत मा. दिल्ली उच्च न्यायालयात स्टि पिटिशन दाखल असुन दिल्ली उच्च न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीसुध्दा दिलेली आहे. याकडे ही सरकार दुर्लक्ष करित आहे. संघटनेने सदरहू जीएसआर रद्द करण्याची मागणी केली आहे. कोरीना काळात GSR 220(E) दि. २६.०३.२०२० काढून सरकारने औषधाची होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सुट दिली होती. कोरोना संपुन पाचवर्ष उलटल्यानंतर ही सदरहू नोटिफिकेशन वारंवार बिनंती करुन ही रद्द करण्यात आलेले नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भागभांडवल जाळून औषध विक्रीचा व्यवसाय करत आहेत तसेच कार्पोरेटद्वारे अव्यावसायिक स्पर्धा निर्माण केली जात आहे. ज्यामुळे अनेक छोटे व्यावसायिक अडचणीत येत असून ग्रामीण भागातील औषधी बितरण व्यवस्था धोक्यात येऊ शकते.

जगन्नाथ शिंदे पुढे म्हणाले की, सरकारने Drug Price Controled Order (DPCOed) 2013 या कायद्यानुसार Manufacturer कडुन काही जीवनाश्यक औषधीबर 8% होलसेलरला व १६% रिटेलरला व अनियंत्रित औषधीवर १०% होलसेलर व २०% रिटेलरला नफा देण्यात येतो. याउपर कार्पोरेट कंपन्या आपले भागभांडवल जाळून अव्यावसायिक स्पर्धाकरित २० % ते ५० % डिस्काउंट देतात. यामुळे संपुर्ण देशातील १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येऊन बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सरकारने Drug Price Control Order (DPCO) 2013 अंतर्गत १६% एवढा नियंत्रित केलेला नफा याबाबतची तरतुद मागे घ्यावी तसेच औषध विक्रेत्यास डॉक्टरने लिहिलेल्या औषधासारखी अनेक Brand sustbitute औषधी देण्याचा अधिकार दिल्यास औषध विक्रेते ही स्पर्धेला उत्तर देऊन सक्षमपणे कार्पोरेट कंपन्यासोबत लढा देऊ शकतील.

एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, केंद्र शासनाचे संबंधित विभागाचे मंत्री तसेच संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार निवेदने देऊन तसेच प्रत्यक्ष भेटीसाठी वेळ मागून ही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ही निवेदन देऊन याकडे लक्ष देण्याची विनंती केली. त्यास ही प्रतिसाद न मिळाल्यामुळे संघटनेस आंदोलनात्मक भुमिका घ्यावी लागली व त्या अंतर्गत झालेल्या निर्णयानुसार दि. २० मे २०२६ रोजी अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा बंद पुकारण्यात आला आहे.

राज्यसंघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी सदरहू बंद महाराष्ट्र राज्यात १००ज्ञ् यशस्वी होईल यासाठी संपुर्ण सभासद बंदच्या मानसिकतेत असल्याचे स्पष्ट केले ते पुढे असे ही म्हणाले की, लोकशाही मार्गात केलेल्या प्रयत्नांना सरकार कडून योग्य व सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे सभासदांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे-

राज्यसंघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, सरकारने आमच्या समस्यांवर न्याय भुमिका न घेतल्यास आंदोलनाचा पुढील टप्पा ठरविण्यात येईल व त्यामुळे जनतेस येणाऱ्या समस्यांना संपुर्णपणे सरकार जबाबदार राहील. संघटनेचे अनिल नावंदर, प्रसाद दानवे, सौरभ मालानी, संजय बोबडे, प्रवीण देशमुख, तुषार कासणे, मनोज डफळे, श्रीकांत राजुरकर, राजाभाऊ टाक, अजय टाले, दीपक त्यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांची ही उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि ११ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


जीवन प्राधीकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'!
* योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?
करोडो रूपये भ्रष्टाचारातून कुठे वळविले...
नळाचे नव्हे तर तोंडचेही पाणी पळविले!
*जिल्ह्यात अनेक गावात तीव्र पाणी टंचाई * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना
*तीन वेळा आला शेकडो कोटीचा निधी
*कागदोपत्रीच योजनेचा केला विधी
*आता जलजीवन मिशनच आधी
भ्रष्टाचाराची चतु:सूत्री, योजना कागदोपत्री!
योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?
साहेब, नळाचे पाणी कुठे झाले गायब!
* योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?

४० वर्ष कोणाची मनमानी...


## जीवन प्राधीकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'...

# नळाला आलेच नाही पाणी !

*जिल्ह्यात अनेक गावात कृत्रीम पाणी टंचाई * नळयोजना सुरू दाखवा अन् बक्षीस मिळवा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ग्रामीण भागात जनतेला स्वच्छ पाणी देण्यासाठी शासनाच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने पेयजल योजना राबविण्यात येत आहे. मात्र ४० वर्षापासून वाशीम जिल्ह्यातील करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या नळ योजनेतून अद्यापही जिल्ह्यातील कोणत्याच गावात पाणी पुरवठा सुरू झाला नसल्याचे चित्र आहे. ज्या गावात सुरू झाला त्या गावात मात्र कागदोपत्री दाखविण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे विभागाचे शेकडो करोडो रूपये तीन वेळा निधी येवूनही 'पाण्यात' गेले आहेत. या विभागात अधिकारी व ठेकेदाराच्या संगणमताने करोडो रूपयाचा महाघोटाळा झाला असून ही योजना सुरू नसतांनाही ग्रामपंचायतीकडून कर वसूली मात्र कशासाठी केल्या जाते असा प्रश्न जनतेला पडला आहे. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाखाली पुन्हा सुरू करण्याऐवजी भ्रष्टाचाराच केल्या जात आहे. फक्त कारंजा शहरातच जलजीवन मिशनची नळ योजना सुरू आहे.







शासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरणची स्थापना करण्यात आली. मात्र या विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी वाशीम जिल्ह्यात स्वातंत्र्य काळापासून राबविण्यात आलेल्या योजनेत अंतर्गत एकाही गावात प्रत्यक्षात पाणी पुरवठा केला नाही. भ्रष्टाचाराची वाळवी लागलेल्या ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योजनाच हडप केली.

लाखो रूपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेकडून मात्र कर वसूली केली. प्रत्यक्षात मात्र कुठेही पाणी पुरवठा केला नाही. आता या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासाठी या योजनेचे पुनरूज्जीवन करून मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनेला शेकडो करोडो रूपयाचा निधी तीन वेळा प्राप्त झाले आहेत. या नळयोजना चालू करण्यासाठी सोलर पंपही बसविण्यात येणार आहे. आधिच्याच करोडो रूपयाचा घोटाळा करून सुरू न केलेल्या अर्धवट अवस्थेत असलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी देण्यात आला. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकलेल्या अधिकारी व ठेकेदारांना आता जुन्या भ्रष्टाचारावर नवीन भ्रष्टाचार करायला संधी मिळणार आहे. अगोदरच करोडो रूपये खर्च करूनही कधीही न सुरू झालेली नळयोजना कागदोपत्री सुरू दाखविली होती. किंवा खाजगी नळयोजना ग्रामपंचायतीला हाताशी धरून आपली नळयोजना सुरू असल्याचे दाखविले आहे. आता ह्याच जुन्या नळयोजना जलजीवन मिशनच्या नावाखाली थातुरमातूर सुरू करून पुन्हा अधिकारी व ठेकेदार महाघोटाळ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हक्काचे पाणी जनतेपर्यंत पोहोचल किंवा नाही याची श्वाश्वती देता येत नाही. त्यामुळे जुनी

नळयोजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा किंवा जनतेनी आता पाण्यासाठी पेटून उठायची गरज आहे. काही अधिकाऱ्यांनी या संबंधि विचारणा केली असता बंद पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या करण्याची विनंती केली होती. मात्र त्या जिल्हा परिषदेने स्वीकारली नाही. तर योजना जिल्हा परिषदेला द्यायची असेल तर माग अधिकाऱ्यांना पगार कशाचा द्यायचा असा प्रश्न पडतो. अधिकारी व ठेकेदार योजनेत भ्रष्टाचार करून हडप करण्यासाठीच असतात काय? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. त्यामुळे ह्या योजना सुरू करण्यासाठी गाव पातळीवर पाणी द्या अन्यथा पाणी पेटवा आंदोलन उभारण्याची गरज आहे.

## थोडक्यात

### मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी.

मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, कारंजा रोड, आंबेडकर चौक, बसस्थानक चौक व मानोरा रोड व ,पोस्ट ऑफिस रोड इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे तसेच या तील अनेक भागात मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला असतो त्यामुळे रहदारिस मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे.त्यामुळे शहरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अतिशय आवश्यक आहे. अन्यथा शहरातील मोकाट गुरांच्या अडचणी मुळे होणारे अपघात व अन्य गोष्टींची नुकसानी ची जबाबदारी नगर पालिकेने घेऊन त्या बाबत अधिकृत पत्रक काढावे तरी मुख्याधिकारी साहेब यांना विनंती की, त्यांनी पालिका प्रशासन मार्फत आवश्यक कार्यवाही व व्यवस्था करून शहरातील मोकाट गुरांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अन्यथा भाजपचा नेतृत्वाखाली नागरिकांना सोबत घेऊन नगर पालिका मुख्याधिकारी यांच्या कक्षाचे प्रवेशद्वारा ला मोकाट गुरांच्या शेणाने सारवण करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे.

# राजुभाऊंचा एकच ध्यास, वार्डासह शहराचा विकास !

## विविध विकास कामाचा भूमीपूजन सोहळा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●










सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि १० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नगर 'सेवक' नव्हे ; खरा जन 'सेवक'..
राजूभाऊचे 'राज' कारण नव्हे; समाजकारण, कोट्यावधीच्या विकास कामाचे धोरण!
उद्या विविध विकास कामाची भूमिपूजन

वाशिम शहरातील प्रभाग क्रमांक १३ मध्ये नागरिकांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात होत असून, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत भव्य भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पालकमंत्री मा. श्री. दत्तामामा भरणे यांच्या निधीतून होत असलेल्या या विकासकामांमुळे परिसराच्या सौंदर्यात आणि सुविधांमध्ये मोठी भर पडणार आहे. त्यामुळे राजकारणातून समाजसेवा करणाऱ्या राजुभाऊ वानखेडे यांनी एकाच ध्यास धरला असून वार्डासह शहराचा विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या अंतर्गत शिवालय मंदिर ते शिवजल परिसरापर्यंत नवीन नाली बांधकाम तसेच विठ्ठल मंदिर ते बाल समुद्र मंदिरापर्यंत नाली बांधकाम करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन हाती घेतलेल्या या कामांमुळे पावसाळ्यातील पाणी साचण्याची समस्या कमी होऊन परिसर अधिक स्वच्छ आणि सुस्थितीत राहण्यास मदत होणार आहे.या विकासकामांचे भूमिपूजन मा. श्री. अनिल भाऊ केंदळे, नगराध्यक्ष वाशिम यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

यामध्ये श्री. राजुभाऊ विठोबा भांदगे, श्री. राहुलभाऊ मोतीरामजी तुपसांडे तसेच शे. खाजाबी सुर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.दिनांक ११ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विठ्ठल मंदिराजवळ हा सोहळा पार पडणार असून, परिसरात यानिमित्त उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात येत आहे. 'जनतेची सेवा हाच आमचा ध्यास' या विचारातून प्रभागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे नगरसेवक मा. श्री. राजू भाऊ वानखेडे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'

# मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे याकडे



दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

# भडके लेआउटमध्ये विकासकामांचा शुभारंभ

## भव्य भूमिपूजन सोहळ्याने परिसरात आनंदाचे वातावरण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●









वाशिम शहरातील प्रभाग क्रमांक ९ अंतर्गत भडके लेआउट परिसरात नवीन विकासकामांना सुरुवात होत असून, नागरिकांच्या सुविधांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भव्य भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत पालकमंत्री मा. श्री. दत्तामामा भरणे यांच्या निधीतून हे विकासकाम साकार होत आहे.

भडके लेआउट येथे अकोला हायवे ते संतोष इंगळे घरापर्यंत रस्ता निर्माण करण्यात येणार असून, या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्यासोबतच परिसराच्या विकासालाही गती मिळणार आहे.या विकासकामाचे भूमिपूजन मा. श्री. श्यामभाऊ रा. खोडे, आमदार वाशिम मतदारसंघ यांच्या हस्ते संपन्न होणार असून कार्यक्रमाला नगराध्यक्ष मा. श्री. अनिल भाऊ केंदळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच मा. श्री. राजुभाऊ विठोबा भांदगे, श्री. राहुल मोतीराम तुपसांडे, मा. सौ. अरुणाताई वसंतराव वटाणे आणि मा. श्री. अनिलभाऊ ताजने यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.दिनांक ११ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भडके लेआउट येथे हा मंगल सोहळा पार पडणार असून, परिसरात यानिमित्त उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या लोकप्रतिनिधींप्रती नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.'जनतेची सेवा हाच आमचा ध्यास' या भावनेतून सुरू असलेल्या विकासकामांमुळे प्रभागाच्या प्रगतीला नवी दिशा मिळत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. ११ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# खामगाव डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याला आग

**खामगाव:** शहरातील रावण टेकडी परिसरातील डंपिंग ग्राउंडवर साचलेल्या कचऱ्याला १० मे रोजी दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच खामगाव नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे दोन ते तीन तास अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. उन्हाळ्यात डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याला आग लागण्याच्या घटना दरवर्षी घडत असल्याचे चित्र आहे. यंदाही त्याची पुनरावृत्ती झाल्याने परिसरात धुराचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण झाले.



# राजुरा शिवारातील हत्येचा उलगडा; बापानेच घेतला मुलीचा जीव !

## प्रेमसंबंधाचा संशय; आरोपी वडील व भावाला अटक

प्रतिनिधी ११ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील राजुरा शिवारात अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडलेल्या महिलेच्या शीरविरहित मृतदेह प्रकरणाचा पोलिसांनी अवघ्या १२ दिवसांत छडा लावला. कौटुंबिक कारणातून वडिलांनीच मुलीची हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळल्याचे तपासात समोर आले असून, धड आणि शीर वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिशाभूल करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी मृत महिलेच्या वडील व भावाला अटक केली आहे.

जळगाव जामोद पोलिस ठाण्यात २६ एप्रिल रोजी मीना मनीष तडवी यांनी तक्रार दिली होती. राजुरा शिवारातील आसिफ हमीद मुल्लाजी यांच्या शेताजवळील नदीकाठी एका महिलेचा शीर नसलेला, अर्धवट जळालेला मृतदेह आणि जवळच मानवी कवटी आढळून आली होती. मृतदेहाजवळ गुलाबी रंगाच्या चपला, काळसर स्कार्फ आणि काळ्या मण्यांची पोत सापडली होती.

या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध हत्या आणि पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेला निर्देश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली पथके तयार करून जळगाव जामोद, संग्रामपूर, अमरावती, अकोला, जळगाव (खान्देश) तसेच मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर परिसरात तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान बुऱ्हाणपूर जिल्ह्यातील खकणार पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या बेपत्ता महिलेच्या तक्रारीची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार खडकी (ता. खकणार, जि. बुऱ्हाणपूर) येथील बापूराम नथ्थू कलमेकर आणि त्यांचा मुलगा अजय बापूराम कलमेकर यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत मृत महिला ही त्यांची मुलगी व बहीण शिवानी बापूराम कलमेकर असल्याची कबूली त्यांनी दिली.

**पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न**

मृत महिलेची ओळख पटू नये, म्हणून आरोपींनी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला, तसेच धड आणि शीर वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिले. रक्ताने माखलेले कपडे आणि वापरलेले हत्यार जंगलात फेकून दिल्याचेही तपासात उघड झाले आहे. त्यानंतर आरोपींनी मुलगी बेपत्ता झाल्याची खोटी तक्रार खकणार पोलिस ठाण्यात दाखल केल्याचे उघडकीस आले. घटनेच्या तपास पथकात जळगाव जामोद पोलिस निरीक्षक नितीनकुमार पाटील, सहायक पोलिस निरीक्षक यशोदा कणसे, पंकज सपकाळे आदींनी सहभाग घेतला.

# धरणगाव येथील उड्डाणपुलावर 'बर्निंग ट्रक'चा थरार!

## उडी घेतल्याने चालक बचावला: साहित्य खाक

प्रतिनिधी ११ मे



**मलकापूर:** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील धरणगाव उड्डाणपुलावर धावत्या ट्रकने अचानक पेट घेतल्याची घटना रविवारी, १० मे रोजी सकाळी ८:४० वाजता घडली. चालकाने प्रसंगावधान राखत ट्रकमधून उडी घेतल्याने त्याचा जीव वाचला; मात्र ट्रकमधील साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

ट्रक (क्र. जीजे ३९ जी ८०५७) मुक्ताईनगरकडून मलकापूरकडे येत होता. दरम्यान, तालुक्यातील धरणगाव उड्डाणपुलावर ट्रकच्या इंजिनमधून अचानक धूर निघू लागला आणि काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले.

उड्डाणपुलावर धावत्या ट्रकला आग लागल्याचे पाहून नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. महामार्ग पोलिस व शहर पोलिसही तातडीने दाखल झाले; मात्र आग आटोक्यात येत नसल्याने पाहून अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने सुमारे २० मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली. तोपर्यंत ट्रकमधील माल पूर्णपणे जळून खाक झाला होता. ट्रकमध्ये शॉर्टसर्किट होऊन त्याचा परिणाम डिझेल टाकीवर झाल्याने आगीचा भडका उडाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने चालकाने वेळेत उडी टळली. घेतल्याने ट्रकमधून जीवितहानी टळली.

# कनारखेड शेतशिवारातील गोठ्याला भीषण आग

## शेती साहित्य, कडबा कुट्टी, पाइप जळून खाक

प्रतिनिधी ११ मे



**कनारखेड:** गावालगतच्या शेतशिवारातील गोठ्याला रविवारी (१० मे) दुपारी अचानक आग लागली. या आगीत कडबा, कुट्टी व पाइप जळून खाक झाले. उष्ण तापमानामुळे गोठ्याजवळ ठेवलेल्या कळबा व कुट्टीने पेट घेतल्याने आग भडकली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी विनोद रामधन सुलतान यांच्या शेतातील टिनशेडच्या गोठ्याजवळ मोठ्या प्रमाणात कळबा व कुट्टी ठेवण्यात आली होती. त्याला अचानक आग लागली आणि काही क्षणांतच आगीने संपूर्ण गोठ्याला वेढले. घटनेच्या वेळी गोठ्यात बैलजोडी आणि एक गाय बांधलेली होती; मात्र स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत तातडीने गुरांना बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच शेगाव नगर परिषद अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तत्परतेने आग आटोक्यात आणली; मात्र तोपर्यंत गोठा, शेतीसाठी वापरण्यात येणारे पाइप, तसेच इतर साहित्य जळून खाक झाले होते. या आगीत शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# उन्हाच्या तडाख्यामुळे ओव्हरहीट ट्रान्सफॉर्मरला 'कूलर'चा आधार!

## सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरणची धडपड; उपकेंद्रांमध्ये विशेष उपाययोजना

प्रतिनिधी ११ मे



**खामगाव:** महावितरणकडून तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वीज वितरण यंत्रणा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. पश्चिम विदर्भात तापमानाने ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडल्याने वीज उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मरवर ताण वाढला असून, त्यांना थंड ठेवण्यासाठी विशेष कुलर बसविण्यात आले आहेत.

महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रांमध्ये सामान्यतः एक किंवा दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यरत असतात. या ट्रान्सफॉर्मरची क्षमता साधारणपणे ५ ते १० एमव्हीए इतकी असून, एका ट्रान्सफॉर्मरद्वारे हजारो ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. ट्रान्सफॉर्मरमधील ऑइल उष्णता नियंत्रण व इन्सुलेशनसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र, तापमानात मोठी वाढ झाल्यास हे ऑइल अतिउष्ण होऊन त्याचे गुणधर्म बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होणे, बिघाड होणे किंवा आग लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. याकरिता महावितरणकडून उपाय करण्यात येत आहे.

**नागरिकांनी सहकार्य करावे - महावितरण**

वाढत्या तापमानामुळे विजेच्या मागणीतही मोठी वाढ झाली असून संपूर्ण वीज वितरण यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी उष्णतेची पर्वा न करता खंडित वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. नागरिकांनीही या काळात सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

**बाह्य भागावर थंड हवा!**

महावितरणकडून पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या बाह्य भागावर थंड हवा देण्यासाठी कुलरचा वापर करण्यात येत आहे. यामुळे ट्रान्सफॉर्मरचे तापमान नियंत्रणात ठेवून संभाव्य बिघाड टाळण्याचा प्रयत्न केला जात आहे. पॉवर ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्यास हजारो ग्राहकांचा वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित होऊ शकतो. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर सुरक्षित ठेवण्यासाठी धडपड सुरू आहे. खामगाव उपविभागातील माटरगाव, पिंपळगावराजा आदी वीज वितरण केंद्रात कुलर बसविण्यात आले आहेत.

# शेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला प्रतिसाद

## शेकडो नागरिकांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ

प्रतिनिधी ११ मे

**शेगाव:** नागरिकांना पारदर्शक, त्वरित आणि सुलभ शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाच्या पहिल्या टप्प्याचा शेगाव येथे उत्साहात समारोप झाला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी टाऊन हॉल येथे पार पडलेल्या या शिबिराला शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष प्रकाश शेगोकार गाशाली गल, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, तहसीलदार प्रज्ञा काकडे, मुख्याधिकारी जयश्री काटकर, गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत, भूमिअभिलेख उपअधीक्षक रवींद्र सोनार व तालुका कृषी अधिकारी अभिमन्यू चोपडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच सेतू व आधार केंद्र चालक उपस्थित होते. शिबिरात महसूल विभागामार्फत २०५ फेरफार नोंदी, २३२ डिजिटल सातबाराचे वितरण करण्यात आले.

**'स्व-गणने'चे आवाहन**

याशिवाय शिबिरात जमीन जोडणी, शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, ई-मोजणी अर्ज, लक्ष्मी मुक्ती व सलोखा योजना अर्ज, 'लाडकी बहीण' योजना केवायसी तसेच आधार कार्ड अद्ययावत करण्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. कृषी विभागातर्फे पीक पेरणीबाबत, तर पंचायत समितीमार्फत शेत सिंचन विहीर योजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी रामेश्वर पुरी यांनी नागरिकांना 'स्व-गणना' करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले, तसेच १ जानेवारी २०११ पूर्वीच्या अतिक्रमणांचे नियमन आणि तुकडेबंदीमुळे प्रलंबित खरेदी नोंदीबाबत शासन योजनांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

# एसटी बसमध्ये बिघाड; प्रवाशांची गैरसोय

प्रतिनिधी ११ मे

**गोहोगाव दांदडे:** येथे एसटी बसमध्ये बिघाड झाल्यामुळे वाहन चालकांनी प्रवाशांची पुढे जाण्याची व्यवस्था न करता वाऱ्यावर सोडल्या गत त्यांना पुढील प्रवास खासगी वाहनाने व स्वखर्चाने करावा लागला. त्यांना नाहक त्रास सहन करावा लागल्यामुळे प्रवाशी महामंडळाविषयी रोष व्यक्त करत असल्याचे पाहायला मिळाले.

मेहकर एसटी बस आगारा मार्फत असलेल्या डोणगाव या ठिकाणावरून गोहोगाव, पांगरखेड, बेलगाव, विठ्ठलवाडी, जमुना, राजगड, चिंचाळा, विश्शी, तसेच शेलगाव, कनका, मादनी, आरेगाव, इत्यादी मार्गावर बसची सेवा (फेऱ्या) पूर्वीच्या जातात. त्यातच आता काही दिवसापासून या मार्गावर मोठ्या प्रमाणात फेऱ्या बंद केल्या असल्याने ज्या आहेत त्या सुद्धा व्यवस्थित नसल्याचे पाहायला मिळत आहे. यामध्ये ९ मे रोजी दुपारी ११ वाजता दरम्यान गाडी क्र. एमएच १४ बी ४५४३ या नंबरची एसटी बस डोणगाव ते बेलगाव, राजगड, ही बस फेरी जात असताना पहिलाच स्टाफ असलेल्या गोहोगाव, येथे बसमध्ये बिघाड झाला. यावेळी बसमध्ये जवळपास २०.च्या वर प्रवासी आणि इतर काही विद्यार्थी प्रवास करीत असल्याची माहिती वाहक यांनी दिली. यामध्ये बेलगाव, पांगरखेड, विठ्ठलवाडी, जमुना, राजगड, इत्यादी गावातील प्रवास करणाऱ्या प्रवाशांची पुढील प्रवासाची पर्यायी व्यवस्था न करता गाडीत बिघाड झाल्याने गाडी पुढे जाणार नाही. अशी माहिती वाहक व चालक यांनी देऊन एसटी महामंडळाच्या वतीने पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे गाडीतील प्रवाशांना पुढील प्रवास आपापल्या परीने खाजगी वाहनाने व स्वखर्चाने करावा लागला. यामध्ये काही ज्येष्ठ नागरिक महिला यांचा देखील समावेश होता याविषयी वाहन चालक यांना आमच्या प्रतिनिधीने विचारणा केली असता ग्रामीण भागात दुसऱ्या गाडीची तरतूद करणे शक्य नाही, व पैसे सुद्धा वापस करता येत नाहीत, अशी माहिती दिली. एकीकडे महाराष्ट्र शासनाच्या वतीने जनतेचा प्रवास सुकर व सोयीचा व्हावा यासाठी जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना हाफ तिकीट, इत्यादी सेवा देत असल्याचा मोठ्या प्रमाणात वाजा गाजा चालू असून दुसरीकडे मात्र भाडेवाढ मोठ्या प्रमाणात केली असल्याने प्रवास करणारे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला आर्थिक झळ बसत असल्याने त्रस्त आहेत.

# पाच महिन्यांपासून रेशन दुकानदारांचे कमिशन थकीत !

## संघटनेचे निवेदन; कमिशन अदा करण्याची मागणी

प्रतिनिधी ११ मे

**खामगाव:** जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे गेल्या पाच महिन्यांपासून धान्य वितरणाचे कमिशन थकीत असल्याने दुकानदार आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर खामगाव स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने शुक्रवारी तहसीलदारांना निवेदन देऊन थकीत कमिशन अदा करण्याची मागणी आहे. दुकानदारांना जानेवारीपासून कमिशन मिळालेले नाही.

**दुकानदारांच्या आर्थिक अडचणी वाढल्या!**

कमिशन थकल्यामुळे दुकानदारांना दुकानाचा खर्च, वाहतूक, कर्मचारी मानधन तसेच इतर दैनंदिन आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने त्वरित थकीत कमिशन अदा करून रेशन दुकानदारांना दिलासा द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. निवेदन देताना स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष रवि महाले, सचिव विजय रायगावकर यांच्यासह तालुक्यातील अनेक रेशन दुकानदार उपस्थित होते.

# शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी ११ मे

**मोताळा:** तालुक्यातील राहेरा येथे एका युवा शेतकऱ्याने ४६ वर्षीय कर्जबाजारीपणाला कंटाळून धरणात उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज रविवार १० मे रोजी सकाळी ८.४५ वाजेच्या सुमारास घडली. मृतक शेतकऱ्याचे नाव बबन जाधव असे आहे. राहेरा येथील अल्पभूधारक शेतकरी बबन देविदास जाधव (वय ४६) यांच्याकडे अडीच एकर शेती असून उदरनिर्वाह शेतीवरच चालायचा. सततची नापीकी व त्यात शेतीला लावलेला खर्च निघाला नसल्याने ते मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले होते. दुसरीकडे खाजगी पतसंस्थेचे वाढते कर्ज, कर्ज कसे फेडावे? कुटुंबीयांचा उदरनिर्वाह कसा करायचा? या विवचनेत जाधव सापडले होते. त्यांनी कर्ज बाजारीपणाला कंटाळून राहेरा शिवारातील एका धरणात उडी घेऊन आत्महत्या केली. सदर घटना आज १० मे रोजी सकाळी ८.४५ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. बबन जाधव यांच्यावर खाजगी पतसंस्था व इतर असे ५ लाख रुपयांचे कर्ज असल्याची माहिती कुटुंबीयांनी देत कर्ज कसे फेडावे, या विवेचनात त्यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती दिली. घरातील कर्ता पुरुष गेल्याने जाधव कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# किसान क्रेडिट कार्डसाठी आता प्रक्रिया सुलभ!

## शेतकरी आणि पशुपालकांसाठी सुवर्णसंधी

प्रतिनिधी ११ मे

**शेदुर्जन:** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आणि कृषी संलग्न व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांच्या आर्थिक प्रगतीसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँकांकडून कागदपत्रांची प्रक्रिया अधिक स्पष्ट आणि सुलभ करण्यात आली असून, शेदुर्जन परिसरातील शेतकरी आता विविध मार्गांनी आपले अर्ज सादर करू शकतात.

शेतकरी आपले अर्ज दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून देऊ शकतात. तसेच गावातील स्थानिक स्वराज्य संस्था किंवा थेट बँकेच्या शाखेत जाऊनही अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. विशेषतः दूध संघांमार्फत अर्ज करणाऱ्या सदस्यांसाठी त्रिपक्षीय करार आवश्यक असेल. ओळखीचा पुरावा आणि वास्तव्याचा पुरावा म्हणून आधार कार्ड अनिवार्य आहे. आधार नसल्यास मतदान कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा पॅन कार्ड चालू शकते. अर्जदाराचे ६ महिन्यांपेक्षा जुने नसलेले २ फोटो आवश्यक आहेत, जमिनीचे रेकॉर्ड ७/१२, ८-अआणि फेरफार उतारा जो ६ महिन्यांपेक्षा जुना नसावा. २ लाखांवरील कर्जासाठी 'लीगल सर्च रिपोर्ट' आवश्यक आहे. तसेच बचत खाते बँकेत नसल्यास ते उघडून घेणे बंधनकारक आहे.

केवळ शेतीच नव्हे, तर दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्यपालनासाठीही या कार्डचा लाभ घेता येईल : जनावरांची संख्या आणि त्यांच्या निवाऱ्यासाठी (शेड) पुरेशी जागा असल्याची खात्री बँक करेल. पक्ष्यांची संख्या, शेडचा तपशील आणि पक्ष्यांचा विमा असणे आवश्यक आहे. तलाव किंवा टाकीचे क्षेत्र, मासेमारीचा परवाना आणि बियाणे उपलब्धतेचा तपशील द्यावा लागेल. सामाजिक सुरक्षा आणि कर्ज प्रक्रिया, अर्जाची छाननी करताना बँका 'क्रेडीट इन्फॉर्मेशन ब्युरो' कडून डिफॉल्ट रेकॉर्ड तपासणार आहेत. तसेच, अर्जदाराने इतर बँकांकडून कर्ज घेतले नसल्याचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक आहे. यासोबतच, पीएम किसान लाभार्थ्यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत विम्याचे संरक्षणही दिले जाणार आहे.

बँकेच्या अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष भेटीनंतर आणि कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्ज वितरण केले जाईल, असे आवाहन बँकांतर्फे करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त पशुपालक व शेतकऱ्यांनी लाभघ्यावा असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल आंधळे यांनी केले आहे.

# शेगावात दोन घरफोड्या; ५६ हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी ११ मे

**शेगाव:** शहरातील रोकडिया नगर व मंगलम नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी दोन घरांचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम, असा एकूण ५६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहिल्या घटनेत गजानन गणेश

कराळे (३३, रा. रोकडिया नगर, शेगाव) हे प्रसन्न सातव यांच्या घरात भाड्याने राहत आहेत. दि. ८ मे रोजी दुपारी १ ते दि. १० मे रोजी सकाळी ९ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचा कडी कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातून सोन्याचे दोन ओम, सोन्याची अंगठी, सोन्याचे मणी तसेच १० हजार रुपये रोख असा एकूण २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.दुसऱ्या घटनेत विठ्ठल बाबाराव सदर (५६, रा. मंगलम नगर, जुना चिंचोली रस्ता) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे लॉक तोडून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटातून सोन्याची अंगठी, कानातले आणि १५ हजार रुपये रोख असा एकूण ३६ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला.दोन्ही घटनांमध्ये मिळून ५६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. रविवारी गजानन कराळे यांनी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. ११ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# लवकरच शहरात श्वानांचे निर्बीजीकरण, कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याचा प्रस्ताव मंजूर

### शहरात लवकरच चार झोन मध्ये मोकाट श्वानांसाठी शेल्टर होम ची व्यवस्था



प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** महानगरपालिकेची स्थायी समितीची महत्त्वपूर्ण सभा सोमवारी स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली या सभेत मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आल्यानंतर विविध महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेण्यात आले ज्यामध्ये प्रामुख्याने शहरातील भटक्या शहरांच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर श्वानांचे निर्बीजीकरण व दंश प्रतिबंधक लसीकरण करण्यासाठी सेवा पुरवठा दाराकडून प्राप्तगारांना मान्यता देण्याचा प्रस्ताव सभेत मंजूर करण्यात आला शहरात लवकरच चारही झोनमध्ये एक एक शेल्टर होम उभारण्याचे आदेश सुद्धा सभापतींनी दिले. ज्या कंपनीला ब्लॅक लिस्ट केले होते त्याच कंपनीला परत मोकाट श्वान पकडण्याचे काम का दिले जात आहे असा प्रश्न सुद्धा काही सदस्यांनी उपस्थित केला. तसेच ज्या कंपनीला काम दिले जाईल त्या कंपनीला ऑन कॅमेरा शस्त्रक्रिया करण्याची माहिती तसेच दर महिन्याला किती कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली याची सुद्धा माहिती देणे बंधनकारक राहील अशी माहिती सभापतींनी दिली

### कचऱ्याचे बायोमाईनिंग करण्याचा प्रस्ताव मंजूर

◆स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत नायगाव डम्पिंग ग्राउंड वरील उर्वरित कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याच्या कामासाठी निविदेला मान्यता देण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्तावही या सभेत एकमताने मंजूर करण्यात आला शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा मानला जात आहे. ज्या कंपनीला हा ठेका दिला जात आहे त्या कंपनीची माहिती मागितली असता उपस्थित महापालिकेचे अभियंता अजय गुजर नीट माहिती देऊ शकले नाही त्यावर सभापतींनी त्यांना पुढील सभेत संपूर्ण तयारीनिशी येण्याचे आदेश दिले.

### ४ ट्रॅक्टर व काही ट्रॉल्या विकत घ्यायचे सभापतींचे निर्देश

◆शहरातील काही विक्रेते जसे की नारळ पाणी, चहा विक्रेता, फळ विक्रेता आधी व्यावसायिक त्यांच्याकडील कचरा कुठे टाकून देतात त्यामुळे शहरातील प्रत्येक प्रभागात एक एक ट्रॉली उभी करावी ज्यात हे व्यावसायिक त्यांचा कचरा आणून टाकतील व या चार ट्रॅक्टर दररोज हा कचरा डंपिंग ग्राउंड वर खाली करण्याचे काम राहील असे निर्देश सुद्धा सभापतींनी दिले. पाणीपुरवठा विभागातील प्रलंबित देयकांपैकी थकीत देयकांच्या द्वितीय टप्प्यातील रक्कम अदा करण्यास या सभेत मंजुरी देण्यात आली. एकंदरीतच ही सभा आज शांततेत पार पडली विषय पत्रिकेतील सर्व विषयांना मंजुरी देण्यात आली

### शहरातील श्वान पकडण्याआधी महापालिकेतील श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी

◆ अकोला शहरातील मोकाट श्वान पकडण्याआधी महापालिका प्रशासनाने महापालिकेच्या पायऱ्यांवर झोपा काढणाऱ्या श्वानांचा आधी बंदोबस्त करावा अशी मागणी काही महिला नगरसेवकांनी केली महापालिकेच्या कार्यालयात काही कामकाज घेऊन जायचे म्हटल्यास या श्वानांची भीती वाटत असल्याचे त्यांनी सांगितले

# खतांच्या जुन्या आणि नव्या किमती बाबत संभ्रम

प्रतिनिधी ११ मे



**अकोला :** अमेरिका इजरायल ईरान युद्धाचा परिणाम कृषी क्षेत्रावरही झाला आहे. रासायनिक खत उत्पादन साहित्याच्या आयातीत व्यत्यय आल्याने खतांच्या किमती वाढल्या आहेत. दरम्यान, जुन्या आणि नवीन खतांच्या किमतींमधील फरकामुळे शेतकरी आणि दुकानदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. खताच्या पोत्यावर दर्शवलेली जुनी किंमत आणि पीओएस मशीनवर दर्शवलेली नवीन किंमत यामुळे शेतकरी आणि दुकानदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

### युरिया आणि डीएपीच्या किमती स्थिरः

अशी ही माहिती आहे की युरिया आणि डीएपीच्या किमती स्थिर आहेत. त्यात कोणताही बदल झालेला नाही. इतर रासायनिक खतांच्या किमती वाढल्या आहेत. गोदामांमध्ये आधीच असलेल्या खतांच्या पोत्यांवर जुन्या किमती छापलेल्या आहेत. परिस्थिती सामान्य असताना हा साठा गोदामात आला होता. युद्ध सुरू झाल्यानंतर किमती वाढल्या, ज्यामुळे उत्पादन साहित्याच्या आयातीवर परिणाम झाला. पीओएस मशीनमधून नवीन दराने बिले दिली जात आहेत. खताची दोन बिले तयार होतात, एक हाताने लिहिलेले (मॅन्युअल) आणि दुसरे पीओएस मशीनमधून. हाताने लिहिलेल्या बिलावर जुनी किंमत छापलेली असते, तर पीओएस मशीनच्या बिलावर नवीन किंमत छापून येत आहे. बिलांमधील किमतींच्या फरकामुळे शेतकरी आणि कृषी सेवा केंद्र चालक गोंधळात पडले आहेत. शेतकऱ्यांकडून नवीन किंमत आकारावी की त्यांना जुन्या दराने खते द्यावीत, याबद्दलही ते संभ्रमात आहेत. हा प्रश्न सोडवण्यासाठी कृषी सेवा केंद्र चालक संघटनेने सरकारकडे मार्गदर्शन मागितले आहे. या विषयावर अद्याप कोणतेही सरकारी मार्गदर्शन न मिळाल्याने संभ्रम कायम आहे. त्यामुळे सरकारने परिस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

### ♦ उपचारांचा लाभ झाल्याचा रूग्णांचा दावा

प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.




गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.'माझे नाव सेजलसिंग आहे. नाईक होमिओपॅथीमध्ये येण्यापूर्वी मला त्वचेचा खूप त्रास होता. मी आता डॉक्टरांची भेट घेतली, त्यांनी मला अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. त्वचेच्या समस्येतून मुक्त होण्यासाठी त्यांनी दिलेला सल्ला मला खूप आवडला. मी यापुढे माझे उपचार नाईक होमिओपॅथीमध्ये नियमितपणे घेईन.'

# लिनेस क्लब ऑफ अकोलाचा सिंदूर प्रकल्प



प्रतिनिधी ११ मे

**अकोला:** लिनेस क्लब प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख, रीजन चेयरपर्सन लि. ममताजी सूर्या, अध्यक्षा लि. राजेश्री समनपुरे (जायसवाल), सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्षा: लि. अलका उमाळे आणि सदस्यांच्या माध्यमातून सिंदूर सेवा प्रकल्प राबविण्यात आला. लिनेस क्लबने 'सिंदूर सेवा' प्रकल्पांतर्गत एका अशा गरजू महिलेला मदत केली आहे, ज्यांच्या कुटुंबातील तीन मुख्य आधारस्तंभ—वडील, भाऊ आणि पती यांचा कोरोना काळात अकाली मृत्यू झाला होता. कुटुंबातील कर्त्या व्यक्तींच्या निधनामुळे त्या अत्यंत संकटात सापडल्या होत्या. क्लबने आपले सामाजिक कर्तव्य समजून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. स्वप्निलजी समनपुरे यांनी सदर महिलेला त्यांच्या 'संजीवनी क्लिनिक'मध्ये 'कंपाउंडर' या पदावर नोकरी दिली. क्लबतर्फे १००० रुपये रोख स्वरूपात प्रदान करण्यात आले. महिलेसाठी ड्रेस आणि त्यांच्या मुलासाठी शालेय गणवेश व अभ्यासाची पुस्तके देण्यात आली. लि. बबिताजी खंडेलवाल: ५०० रुपयांची आर्थिक मदत तसेच लि. गीताजी रूपारेलिया यांनी ५०० रुपयांची आर्थिक मदत केली. स्टाफ मधील राहील शाह आणि मधुकर पाटील यांना ड्रेसचे कापड देण्यात आले, तसेच डॉ. स्वप्निलजी समनपुरे यांच्याकडून दोघांनाही प्रत्येकी ५०० रुपये देण्यात आले. स्टाफमधील एका ७० वर्षीय व्यक्तीला (ज्यांना कमी ऐकू येते) आणि उपस्थित इतर सदस्यांना 'नॉन-वोव्हन' (कापडी) पिशव्यांचे वाटप करण्यात आले. अतिशय उत्साहाने कार्यक्रम झाला.

# जिप सीईओ अनिता मेश्राम यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

प्रतिनिधी ११ मे

**अकोला:** राज्यभर राबविण्यात आलेल्या 'महासाधना सप्ताह' उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी बद्दल अकोला जिल्हा परिषदेला राज्यस्तरीय सन्मानाने गौरविण्यात आले. मंत्रालयात पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. गौरव सोहळ्यास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा तसेच अति मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. राज्यातील निवडक जिल्ह्यांपैकी अकोला जिल्हा परिषदेला मिळालेला हा



सन्मान जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला. विशेष म्हणजे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी कर्मचारी सहभाग वाढविणे, प्रशिक्षण उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी, समन्वय आणि नियोजन यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# शहरातील वाढत्या प्रदूषणाला एसटी बसेसचा हातभार

### ♦ जुन्या बसमधून निघणाऱ्या काळ्या धुरामुळे नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** शहरात वाढते प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असताना दुसरीकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या व मध्यम श्रेणीतील बसमधून मोठ्या प्रमाणात काळा धूर निघत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून लालपरी बस सेवा सुरू ठेवण्यात आली आहे. मात्र अनेक बस जुन्या झाल्यामुळे त्या प्रवासादरम्यान मोठ्या प्रमाणात काळा धूर सोडत असून काही वेळा रस्त्यातच बंद पडत असल्याच्या घटना घडत आहेत. यामुळे ग्रामीण भागातून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शनिवारी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथून अकोल्याकडे येणारी एक एसटी बस वाशीम बायपासमार्गे बसस्थानक परिसराकडे येत असताना मोठ्या प्रमाणात काळा धूर सोडत असल्याचे दिसून आले. या धुरामुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना समोरील रस्ता दिसणे कठीण झाले होते. तसेच अनेक वाहनधारकांना डोळ्यांची जळजळ व श्वास घेण्यास त्रास होत असल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली. संबंधित डेपो प्रशासनाने अशा जुन्या बसांची तातडीने दुरुस्ती करून प्रदूषणमुक्त वाहतूक व्यवस्था उभारावी, अशी मागणी शहरवासीयांकडून करण्यात येत आहे.



# आधुनिक सुविधांनी सुसज्ज 'आदियोगी फिजिओथेरपी क्लिनिक'चे शानदार उद्घाटन

प्रतिनिधी ११ मे





**अकोला :** शहरातील रामनगर परिसरातील राठी पेढेवाले यांच्या मागे, प्रताप हॉस्पिटलजवळील श्रीसागर हाइट्स येथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या 'आदियोगी फिजिओथेरपी क्लिनिक'चे शानदार उद्घाटन रविवार, १० मे रोजी मोठ्या उत्साहात झाले. खासदार अनुप संजयजी धोत्रे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आमदार रणधीरजी सावरकर, महापौर सौ. शारदाताई खेडेकर, ओझोन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. विनीतजी हिंगणकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, नगरसेविका प्रतिभाताई अवचार, विजय जयपिल्ले, रामनवमी शोभायात्रा समितीचे व सोनार समाज संघटनेचे माजी अध्यक्ष विलासराव अनासाने, श्रीरंगदादा पिंजरकर यांच्यासह शहरातील मान्यवर तसेच डॉक्टर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान डॉ. हेमंत प्रकाश लोंदे यांनी क्लिनिकमध्ये उपलब्ध अत्याधुनिक उपचार सुविधा, यंत्र सामग्री, फिजिओथेरपीच्या आधुनिक पद्धती तसेच रुग्णांना होणारे विविध आरोग्यदायी लाभ याची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. विविध शारीरिक आजार, वेदना व दुखापतींवर तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली क्लिनिकमध्ये फोर डी स्पायनल डी कॉम्प्रेशन टेबल, लेझर मशीन, इत्यादी अत्याधुनिक मशीनद्वारे स्पाइन व पोस्चर सुधारणा, एर्गोनॉमिक मार्गदर्शन, कोर स्ट्रेंथनिंग, पोस्चर असेसमेंट, स्पोर्ट्स इंजरी, रिहॅबिलिटेशन, ऑपरेशननंतरची फिजिओथेरपी, ऑर्थोपेडिक फिजिओथेरपी, कार्डिओ-रेस्पिरेटरी फिजिओथेरपी तसेच न्यूरोलॉजिकल फिजिओथेरपी यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

वेदना नियंत्रणासाठी आयएफटी, टीईएनएस, यूएस व ईएमएस या आधुनिक उपचार पद्धतींचा वापर करण्यात येत असून एक्सरसाइज थेरपी, एरोबिक्स ट्रेनिंग, कपिंग थेरपी, जेरियाट्रिक (वृद्धांसाठी) फिजिओथेरपी, बॅलन्स ट्रेनिंग, फिटनेस व लाईफस्टाईल थेरपी, वजन नियंत्रण मार्गदर्शन, स्ट्रेच व कंडिशनिंग, लवचिकता प्रशिक्षण तसेच क्लिनिकल एक्सरसाइज सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तीन वर्षापेक्षा जास्त अनुभवाच्या माध्यमातून रुग्णांना वैयक्तिक उपचार योजना देण्यात येऊन नागरिकांनी या आधुनिक सुविधांचा लाभ घ्यावा, तसेच सर्व संरक्षण दलातील आजी-माजी अधिकारी कर्मचारी यांना व त्यांचे कुटुंबातील तीन सदस्यांना तसेच दिवंगत अधिकारी कर्मचारी यांचे कुटुंबातील चार सदस्यांना विविध उपचारात सवलत देण्यात येणार आहे. या सर्वाचा लाभ घ्यावाअसे आवाहन डॉ. हेमंत लोंदे यांच्या वतीने करण्यात आले. या अत्याधुनिक क्लिनिकमुळे शहरातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण फिजिओथेरपी सेवा उपलब्ध होणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. या उपक्रमासाठी प्रकाश हिमतराव लोंदे, सौ. अनिता प्रकाश लोंदे व डॉ. रोहित प्रकाश लोंदे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मनपा महिला व बालकल्याण समिती सभा संपन्न

प्रतिनिधी ११ मे

**अकोला :** महानगरपालिकेत महिला व बालकल्याण समितीची सभा झाली. सभेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील महिलांच्या आत्मनिर्भरतेकरिता एन.यू.एल.एम. विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला बचत गटांचा मेळावा आयोजित करणे, महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्याचे वितरण करणे, इयत्ता ५ ते इयत्ता ८ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता आत्मसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणे व याकरिता प्रशिक्षकाची नेमणूक करणे इत्यादी विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला आहे. सभेमध्ये सभापती आरती घोगलिया, सदस्या निकिता देशमुख, सोनाली अंधारे, माधुरी क्षीरसागर, विद्या खंडारे, प्रिया शिरसाट, सोनाली सरोदे, जयश्री बहादुरकर, नीलोफर खान उपस्थित होते.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK